**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

नगरसचिव कार्यालय
दिनांक :- ७/११/२००९

प्रति,
मा. -------------------------------------

स्थायी समिती, सदस्य
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

अहमदनगर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची **सभा क्र.६ बुधवार दि. ११ /११/२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता** महानगरपालिका नवीन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील **मा.स्थायी समिती सभागृह कार्यालयात** खालील विषयावर विचार-विनीमय करण्यासाठी बोलविण्यांत आलेली आहे.

तरी सदर सभेत आपण उपस्थित रहावे हि विनंती.

नगरसचिव,
मा.सभापती साहेब यांच्या आदेशान्वये
अहमदनगर महानगरपालिका.

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :- ६**
**बुधवार दिनांक- ११/११/२००९ ची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ६६ | मा. स्थायी समिती सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २५/०८/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे. |
| ६७ | महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग क्र.अशस/१४०८/४२९/नवि-२४ मुंबई ४२ दि.१७ एप्रिल २००७ अन्वयेचे परिपत्रकानुसार अग्निशमन विभागाकडील वाहनांचा विमोचन आणि आपत्कालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करू देउ नये अशा बाबत ऑफिस रिपोर्ट माहितीस्तव. |
| ६८ | अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये प्लंबर पदाची आवश्यकता असल्याने तात्पुरत्या स्वरूपात वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे कडून पात्र उमेदवारांची यादी मागवून कंत्राटी पध्दतीने प्लंबर पदाची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस व त्याचे मानधन व कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ६९ | अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी /पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ७० | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५७ मधील केडगाव गावठाण अंतर्गत वडार वस्ती व इतर भागातील उघडया गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,०६,१३०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७१ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील कायनेटीक चौका जवळील रोहीदास वाडी स्लम एरिया मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच २०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी.( एनपी २ )ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,००,५६४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |

| | |
|---|---|
| ७२ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५मधील रेल्वे स्टेशन बोहरी चाळ जवळील लक्ष्मी माता मंदिर ते तुळजाभवानी मंदिर पर्यंत रस्ता डांबरीकरण करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,२१,६३३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७३ | श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७४ | श्री. धीरज काशिनाथ सोनवणे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७५ | श्री. भारत लालचंद चावरे ,सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७६ | अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंटची नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ७७ | अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००९-२०१० सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ. |
| ७८ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्यालयापर्यत ३०० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,८५३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ७९ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्यालयापर्यत सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,३६,२८०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८० | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील रामवाडीतील गडाख नाला साफ करून स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२२,४९९/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८१ | अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते रामवाडी कलामंचा पर्यत पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४१,६८४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८२ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागामध्ये डॉ. सौ. सुरेखा निवृत्ती गउळकर यांची वैद्यकिय अधिकारी या पदावर केलेली नेमणूक दिनांक १५ सप्टेंबर २००९ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा रूपये १०,०००/- चे मानधनावर सहा महिन्याकरिता नेमणूक देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट. |
| ८३ | अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता लॅब टेक्नीशियन विहित पध्दतीने दरमहा रूपये ६५००/- चे मानधनावर नेमणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट |

सही /-
नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका

**सोबत**- मा. स्थायी समिती सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २५/०८/२००९ रोजीच्या सभेचे इतिवृत्ताची प्रत व विषय-क्रमांक ६७ ते ८३ च्या टिपणीच्या झेरॉक्स प्रती

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक- ६६ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक -६६ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** मा. स्थायी समिती सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २५/८/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे.

**प्रस्तावाचा मजकूर** :-मा.स्थायी समिती सभा क्रमांक- ४ मंगळवार दिनांक २५/८/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेसाठी मा.स्थायी समिती सभे पुढे ठेविले.

सबब कार्यवृत्त मा.स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २५/८/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणे आहे. मा.सदस्यांनी आपल्या सुचना दुरूस्त्या सांगाव्यात.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- मागिल सभा दिनांक २५/८/२००९ रोजीच्या सभेतील विषया बाबत माहिती सांगावी.

त्याप्रमाणे मागिल सभा दिनांक २५/८/२००९ रोजीचे सभेच अजेंडया वरील विषय वाचून दाखविणेत आले.

मा.श्री. पवार बा.रे.:- मागिल सभेचे इतिवृत्त कायम करणेत यावे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मंजूर करावे.

मा.सभापती साहेब :- मा.स्थायी समिती सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २५/८/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यांत यावे.

**ठराव :-** मा. स्थायी समिती सभा क्रमांक ४ मंगळवार दिनांक २५/८/२००९ रोजीच्या सभेचे कार्यवृत्त कायम करणेस मंजूरी देण्यांत येत आहे.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक- ६७ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक -६७ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग क्र.अशस/१४०८/४२९/नवि-२४ मुंबई ४२ दि.१७ एप्रिल २००७ अन्वयेचे परिपत्रकानुसार अग्निशमन विभागाकडील वाहनांचा विमोचन आणि आपतकालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करू देउ नये अशा बाबत ऑफिस रिपोर्ट माहितीस्तव.

**प्रस्तावाचा मजकूर** :- अ.नगर महानगरपालिका अग्निशमन विभाग जा.क्र. १४९ दिनांक १८/८/०९

सादर, विषय-अग्निशमन वाहनाचा गैरवापर टाळणेबाबत.

संदर्भ-महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग क्र.अशस/१४०८/४२९/नवि-२४ मुंबई-३२ दि.१७ एप्रिल २००७

उपरोक्त संदर्भिकिंत विषयान्वये मुख्य अग्निशमन अधिकारी यांजकडून रिपोर्ट देणेत येतो की, अग्निशमन सेवा हि अत्यावश्यक सेवा असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८५ते २८९ अन्वये प्रमुख्याने नागरिकांचे मालमत्ता व जिवीताचे संरक्षण करणेसाठी अग्निशमन सेवा देणे व आग प्रतिबंधक नियमावली तयार करून अंमलबजावणीची जबाबदारी मा. आयुक्त महानगरपालिका यांचेवर आहे.

परंतु अग्निशमन सेवा हि अत्यावश्यक सेवा असुन सुध्दा या वाहनांचा उपयोग पाणी पुरवठा करणे, मैदानावर पाणी मारणे, पुतळे धुणे, वॉशआउट करणे, झाडांना पाणी देणे इ. सारख्या अग्निशमन सेवेशी संबंधीत नसलेल्या कामासाठी त्याचा वापर करणेकरिता अग्निशमन दलाचे अधिकारी कर्मचा-यांना मा. पदाधिकारी तसेच कार्या. आदेश दिले जातात.

सबब उपरोक्त बाबी अग्निशमन सेवेशी संबंधीत नसताना वरील कामे करावी लागत आहेत. एखादया ठिकाणी दुर्घटना घडल्यास तिथे अग्निशमन वाहन उपलब्ध होण्यास विलंब व विमोचन कार्यात अडथळा निर्माण होउन मोठया प्रमाणात जिवीत व वित्तहानी होण्याची शक्यता निर्माण होते. याबाबत अग्निशमन विभागाची पर्यायाने महानगरपालिकेची बदनामी होउन प्रशासनास टिकेला तोंड दयावे लागेल. असे प्रसंग निर्माण होउ नयेत म्हणून संदर्भिय परिपत्रकान्वये महानगरपालिका अग्निशमन वाहनांचा विमोचन आणि आपतकालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करू देवु नये आणि त्याचा गैरवापर होउ देवू नये. गैरवापर झाल्यास महापालिकेच्या मालमत्तेचा गैरवापर केल्याबद्दल संबंधीताविरूध्द नियमानुसार कारवाई केली जाईल असे महापालिकांतील सर्व संबंधीताच्या निदर्शनास आणावे. अशा आशयाच्या शासन परिपत्रकाबाबत अग्निशमन वाहनाचा गैरवापर टाळणेसाठी संबंधीत सर्व अधिकारी व मा.पदाधिकारी यांना कळविणेस आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे मुख्य अग्निशामक अधिकारी यांचा अहवाल असे. दि १४/८/०९

मा.उपायुक्त (कर)साहेब :- उपरोक्त विषयी शासन परिपत्रकानुसार कार्यवाही करणे योग्य. तसेच याबाबत मा.स्थायी समिती व मा. महासभा यांचे निदर्शनास सादर चे पत्र आणणे योग्य. दि.१४/०८/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.१४/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग क्र.अशस/१४०८/४२९/नवि-२४ मुंबई ४२ दि.१७ एप्रिल २००७ अन्वयेचे परिपत्रकानुसार अग्निशमन विभागाकडील वाहनांचा विमोचन आणि आपतकालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करू देउ नये अशा बाबत ऑफिस रिपोर्ट माहितीस्तव.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अग्निशमन विभागाकडील वाहनांचे वापराबाबत मा. शासनाचे परिपत्रक माहितीसाठी सादर केलेले आहे. ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- प्रभागामध्ये पाणी पुरविण्यांत यावे अशाबाबत किती नगरसेवकांनी मागणी केलेली आहे.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- ब-याच नगरसेवकांची मागणी वॉर्डामधील कार्यक्रमाचे ठिकाणी पाणी पुरवठया संबंधी असते.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- त्याचे रेकॉर्ड असते का ?

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- होय याप्रमाणे केलेल्या पाणी पुरवठया संबंधीच्या नोंदी आमचे कडेस आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- यामध्ये गैरप्रकार काय होतात.

अग्निशमन प्रमुख विभाग श्री. मिसाळ :-मा. नगरसेवकांनी पाणी पुरवठया संबंधी मागणी केल्यास आम्ही त्यांना फायर ब्रिगेडचे वाहनाने पाणी पुरविणे साठी नकार देतो मग तक्रारी होतात. मंदिर परिसरात पाणी मारणे, पुतळे धुणे, लग्न इत्यादी सभारंभासाठी पाणी पुरवठा करणे अशी मागणी असते आणिबाणीचे वेळी असे अग्निशमन वाहन उपलब्ध न झाल्यांस अति प्रसंग निर्माण होउ शकतो ते गैर होते.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- आम्ही पाण्याची मागणी केल्यास आमचे वॉर्डात असा पाणी पुरवठा केला जात नाही.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- ड्रायव्हर ला कडक सुचना देउनही अंमलबजावणी होत नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- असे असतांना अग्निशमन वाहन गाडी पाणी पुरवठया साठी जातेच कसे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- अग्निशमन विभागाकडील वाहनांचा वापर इतर कामासाठी होउ नये.

मा.श्री. भोसले ग.पु.:- मा. सदस्यांना मा. शासनाचे परिपत्रकानुसार कळविण्यांत यावे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- हा प्रस्ताव असा आहे की, अग्निशमन सेवा ही अत्यावश्यक सेवा असल्याने मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २८५ ते २८९ अन्वये प्रमुख्याने नागरिकांचे मालमत्ता व जिविताचे संरक्षण करणेसाठी अग्निशमन सेवा देणे व आग प्रतिबंधक नियमावली तयार करून अंमलबजावणीची जबाबदारी मा. आयुक्त महानगरपालिका यांचेवर आहे असे असुन सुध्दा अग्निशमन वाहनांचा उपयोग पाणी पुरवठा करणे मैदानावर पाणी मारणे इत्यादी अग्निशमन सेवा व्यतिरिक्त होत असल्याने एखादे ठिकाणी दुर्घटना घडल्यास तेथे अग्निशमन वाहन उपलब्ध होण्यांस विलंब होतो विमोचन कार्यात अडथळा निर्माण होउन अग्निशमन विभागाची पर्यायाने महानगरपालिकेची बदनामी होते. प्रशासनास टिकेला तोंड द्यावे लागते. हे असे सगळीकडे होते ते होउ नये म्हणून मा. शासनाने महानगरपालिकेचे अग्निशमन वाहनांचा विमोचन आणि आपतकालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी गैर वापर होउ नये.गैरवापर झाल्यास संबंधीतावर कार्यवाही केली जाईल. असे महानगरपालिकातील सर्व संबंधीचे निर्देशनास आणावे अशा आशयाचे मा. महाराष्ट्र शासनाचे नगर विकास विभाग क्र.अशस १४०८/४२९/नवि-२४ मुंबई ३२दिनांक १७ एप्रिल २००७ चे परिपत्रकानुसार प्रस्ताव सभेकडेस सादर केलेला आहे. हाच प्रस्ताव महानगरपालिकेचे मा.महासभेपुढे माहितीसाठी सादर करण्यात येईल.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- मा. शासनाचे मंत्र्याचे दौर होतात त्यावेळी अग्निशमन विभागाचे वाहन पाठविले जाते.

मा. उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा. शासनाचे दौ-याबाबतचे आदेशानुसार वाहन पाठविणेत येते.

मा.श्री. लोंढे शि.बा. :- मैदानावर पाणी मारणेचे काम अग्निशमन वाहनामार्फत केले जाते.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा. मंत्री साहेबाचे दौ-याचे वेळी हेलीपॅड इत्यादीचे प्रोटेक्शन साठी अग्निशमन विभागाकडील वाहन पाठविले जाते. तेथील मैदानावर पाणी मारणेचे काम हे बी.अॅन्ड सी मार्फत होते.

मा.श्री.भोसले ग.पुं.:-पाणी पुरवठया कडील पाईप लाईनचे वॉश आउत्ट काढणेसाठी अग्निशमन विभागाकडील वाहनांची आवश्यकता असते.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- आवश्यक वेळी वॉश आउत्ट चे काम करणेत येईल.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- आपले अग्निशमन विभागाकडेस किती वाहने आहेत.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- चार वाहने आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- नागापुर येथे ट्रॅक्टर ला आग लागली होती. तेव्हा अग्निशमन विभाग कडील लहान वाहन तेथे आले होते.

अग्निशमन विभाग प्रमुख श्री. मिसाळ :- अगोदर छोटे वाहन पाठविले होते. नंतर मोठे पाठविले.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- महानगरपालिकेचे सर्व नगरसेवकांना परिपत्रकाची माहिती पत्राद्वारे कळविण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- परिपत्रकाची माहिती देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकडील वाहनांचा विमोचन आणि आपत्कालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करू देउ्र नये. अशाबाबत चे मा.शासनाचे परिपत्रकाची माहिती महानगरपालिकेचे सर्व सदस्यांना कळविण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे. सदरचे परिपत्रक माहितीसाठी मा. महासभेपुढे सादर करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** महाराष्ट्र शासन नगर विकास विभाग क्र.अशस/१४०८/४२९/नवि-२४ मुंबई ४२ दि.१७ एप्रिल २००७ अन्वयेचे परिपत्रकानुसार अग्निशमन विभागाकडील वाहनांचा विमोचन आणि आपतकालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी वापर करू देउ्र नये अशा बाबतचे मा. शासनाचे परिपत्रकाची नोंद घेण्यांत येत आहे. तसेच विमोचन आणि आपत्कालीन प्रसंगाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही कारणासाठी महानगरपालिकेचे अग्निशमन विभागाकडील वाहनांचा वापर करणेत येउ्र नये. अशा बाबत सर्व मा. सदस्यांना कळविणेत यावे.

मा. शासनाचे सदर परिपत्रक महानगरपालिकेचे महासभेपुढे माहितीसाठी सादर

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक- ६८ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक -६८ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये प्लंबर पदाची आवश्यकता असल्याने तात्पुरत्या स्वरूपात वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे कडून पात्र उमेदवारांची यादी मागवून कंत्राटी पध्दतीने प्लंबर पदाची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस व त्याचे मानधन व कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना विभाग दिनांक १५/६/०९

विषय-श्री.सय्यद हिसामोद्दीन सय्यद राजा यांचे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने मानधनावर प्लंबर या पदी नेमणुकीबाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, श्री. सय्यद हिसामोद्दीन सय्यद राजा यांनी अर्ज देवुन " व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई अंतर्गत शासकीय तांत्रिक विद्यालय केंद्र, अहमदनगर येथे प्लंबींगचे प्रशिक्षण पुर्ण केलेले असुन प्लंबर या पदाचा अनुभव असल्याने प्लंबर या पदी मानधनावर नेमुणक करणे बाबत विनंती केलेली आहे.

त्यानुसार पाणी पुरवठा विभाग / वर्क शि. नं. २७८ दि.४/३/०९ अन्वये पाणी पुरवठा विभागाकडे (फिटर) कमी असल्याने त्यांना मानधनावर नेमणुक दिल्यास या विभागाकडील काही अंशी पाईप लाईन गळती,दुषीत पाणी, पाईप लाईन चोकप इत्यादी सारख्या महत्वाची कामे मार्गी लागु शकतील करीता या विभागाकडील कर्मचारी यांची कमतरता व कामाची निकड पाहता अर्जदार सय्यद यांना मानधनावर नेमणुक देणे योग्य होईल" असे नमुद केलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालीलप्रमाणे नमुद केलेले आहे.

५३ :- नेमणुकीचे अधिकार कोणामध्ये निहित असणे.

१. महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक आहे मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळुन चारशे किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामासाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणुका सहा महिन्याहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समिती पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की, आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयक महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२. पोट कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखालील नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगर पालिका सचिव यांच्याकडे निहित असेल मात्र कोणत्याही विशिष्ठ प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही असे उक्त समितीने ठरविले तर अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या आधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगर पालिका अधिकारी व कर्मचारी मग ते कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणुक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहित असेल.

परंतु कायम नेमणुकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या त्यावेळी अंमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीवाचुन कोणतीही तात्पुरती नेमणुक सहा महिन्याहुन अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळुन शंभर रूपयाहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही. असे नमुद केलेले आहे.

तरी पाणी पुरवठा विभागाकडील उपरोक्त प्रस्तावाप्रमाणे श्री. सय्यद हिसामोद्दीन सय्यद राजा यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने प्लंबर या पदी मानधनावर नेमणुकीबाबत आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि. १६/६/०९

मा.उपायुक्त(सा.)साहेब :-मॅके.इंजि.यांचा अभिप्राय घेउन्न (सघ्यस्थिती)मंजुरीसाठी फेरसादर करा दि.१६/६/०९

मॅकेनिकल इंजि. :- मा.सादर, पाणी पुरवठा विभागात सध्या फिटर ची संख्या कमी आहे. कामांची व्याप्ती पहाता अजुन फिटरची आवश्यकता आहे.

अर्जदार सय्यद यांना मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देणेबाबत आस्थापना विभागामार्फत नियमानुसार कार्यवाही होणे योग्य वाटते. आदेशार्थ सादर. दि.४/७/०९ / **"अ"**

मा.उपायुक्त (सा.)साहेब :- CAFO **"अ"**बाबत तपासून सादर करा. दि०६/७/०९

मुख्य लेखा अधिकारी :- सादर, पाणी पुरवठा विभागाचे अभिप्राय पाहता व कामाची अत्यावश्यक बाब विचारात घेउन्न श्री. सय्यद राजा यांना मानधनावर पाणी पुरवठा विभागात तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देणेस हरकत नाही. दि. १४/७/०९

मा.उपायुक्त (सा) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत मान्य करणेस हरकत नाही. मात्र मानधनाबाबत स्पष्ट आदेश व्हावेत. दि. १४/७/०९

मा.आयुक्त साहेब :- कंत्राटी पध्दतीने कामाची आवश्यकता विचारात घेउन्न तात्पुरती नियुक्ती करता येईल.दि.१४/७/०९

--**--

फेरसादर,

विनंती सादर करण्यांत येते की, श्री. सय्यद हिसामोद्दीन सय्यद राजा यांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात प्लंबर म्हणुन नेमणुक बाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला. तथापी शासकीय / निमशासकीय कार्यालयाचे तात्पुरत्या अथवा कायम स्वरूपाच्या नेमणुका हया विहीत पध्दतीने करणे बाबत निर्देश दिलेले असल्याने प्लंबर या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यांत येउन्न सदर जाहिराती नुसार श्री. सय्यद हिसामोद्दीन यांना अर्ज करावयास कळविणे उचित वाटते. तसेच त्याचबरोबर मा.सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचेकडून पात्र उमेदवारांची यादी मागविणेस योग्य होईल. तथापी सदर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात प्लंबर या पदावर दरमहा मानधन रक्क्म व कालावधी बाबत मा.स्थायी समिती ची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे.

तरी ओदशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थाना विभाग प्रमुख यांचा अहवाल असे. दि.२७/८/०९

मुख्य लेखा परिक्षक :- सदर विषय स्थायी समितीपुढे ठेवणेस हरकत नाही. दि२७/८/०९

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- प्रस्तावीत स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर. दि.२७/८/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २८/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. पवार बा.रे.:- पाणी पुरवठा विभागाकडील नळ कनेक्शन लिकेजच्योकप पाईप लाईन नादुरूस्त अशा नागरिकांच्या तक्रारीचे निवारण तातडीने होत नाही. आपले कडेस किती प्लंबर फिटर आहेत.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रत्यक्ष जागेवर नेमणूक केलेले फिटर कामे करतात का? आपले कडेस प्लंबर,फिटर कमी आहेत. फिटर, प्लंबरची कामे बिगारीच करतात.

मा.श्री. पवार बा.रे.:- आपले कडेस प्लंबर किती आहेत फिटर किती आहेत.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- सहा हेड फिटर आहेत.

मा.श्री. पवार बा.रे.:- ते कुठे काम करतात त्यांची नांवे सांगावी.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- माहिती घेउन्न सांगतो.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- सदर फिटर, प्लंबर यांची संख्या व कामे या विषयी सविस्तर अहवाल सभेपुढे देण्यांत यावा.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- हा प्रस्ताव सभेपुढे कसा आला आहे. आपणास प्लंबरची आवश्यकता आहे का ?

मा.श्री. पवार बा.रे.:- हया जागा कशा भरणार आहात.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- विनंती सादर करण्यांत येते की, श्री. सय्यद हिसामोद्दीन सय्यद राजा यांना कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात प्लंबर म्हणुन नेमणुक करणेबाबत प्रस्ताव सादर करण्यांत आला. तथापी शासकीय / निमशासकीय कार्यालयातील तात्पुरत्या अथवा कायम स्वरूपाच्या नेमणुका हया विहीत पध्दतीने करणे बाबत निर्देश दिलेले असल्याने प्लंबर या पदासाठी वर्तमान पत्रात जाहिरात देण्यांत येउन्न सदर जाहिराती नुसार श्री. सय्यद हिसामोद्दीन यांना अर्ज करावयास कळविणे उचित वाटते. तसेच त्याचबरोबर मा.सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचेकडून पात्र उमेदवारांची यादी मागविणे योग्य होईल. तथापी सदर कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात प्लंबर या पदावर दरमहा मानधन रक्क्म व कालावधी बाबत मा.स्थायी समिती ची पुर्व मंजुरी घेणे आवश्यक आहे. तरी ओदशार्थ सादर.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- पाणी पुरवठा विभागास प्लंबरची आवश्यकता आहे का? त्यांची मागणी होती का?

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- पाणी पुरवठा विभागाकडेस फिटरची आवश्यकता आहे. अशाबाबत मॅके. इंजि. श्री. निकम यांचा अहवाल आहे.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- प्लंबर, वॉलमन, फिटर यांचे आवश्यकता, कामाचे स्वरूप व नेमणूका करणे बाबत सविस्तर प्रस्ताव सभेपुढे सादर करणेत येईल.

मा.श्री. पवार बा.रे. :- आलेला प्रस्ताव रद्द करावा.

मा.श्री.बारस्कर पो.ज.:-आलेला प्रस्ताव रद्द करावा. पाणी पुरवठा विभागाकडेस आवश्यकते नुसार लागणा-या प्लंबर,फिटर,वॉलमन, चे मानधनावरील नेमणूकी बाबत सविस्तर अहवाल सभेपुढे सादर करणेत यावा.

मा.सभापती साहेब :- पाणी पुरवठा विभागामध्ये प्लंबर पदाची आवश्यकता असल्याने तात्पुरत्या स्वरूपात वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे कडून पात्र उमेदवारांची यादी मागवून कंत्राटी पध्दतीने प्लंबर पदाची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस व त्याचे मानधन व कालावधी ठरविणे बाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव रद्द करण्यांत यावा. तसेच पाणी पुरवठा विभागाकडेस आवश्यक्तेनुसार लागणा-या प्लंबर, फिटर, व वॉलमन चे मानधनावरील नेमणूकी बाबत सविस्तर अहवाल मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव सादर करणेत यावा.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये प्लंबर पदाची आवश्यकता असल्याने तात्पुरत्या स्वरूपात वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे कडून पात्र उमेदवारांची यादी मागवून कंत्राटी पध्दतीने प्लंबर पदाची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस व त्याचे मानधन व  कालावधी ठरविणे बाबत ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**--**--**

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे पाणी पुरवठा विभागामध्ये प्लंबर पदाची आवश्यकता असल्याने तात्पुरत्या स्वरूपात वर्तमान पत्रामध्ये जाहिरात देउन स्वयंरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचे कडून पात्र उमेदवारांची यादी मागवून कंत्राटी पध्दतीने प्लंबर पदाची दरमहा मानधनावर नेमणूक करणेस व त्याचे मानधन व कालावधी ठरविणेबाबत प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार सदर प्रस्ताव रद्द करण्यांत यावा. तसेच पाणी पुरवठा विभागाकडेस आवश्यक्तेनुसार लागणा-या प्लंबर, फिटर, व वॉलमन चे मानधनावरील नेमणूकी बाबत सविस्तर अहवाल मा.स्थायी समिती पुढे मंजूरीस्तव सादर करणेत यावा.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक- ६९ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक -६९ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी /पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रस्तावना-महानगरपालिकेच्या सन २००९-१० करिता अधिकारी / पदाधिकारी यांचे कार्यलयीन कामकाजासाठी भाडयाने वाहने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा नुसार सर्वात कमीचे दराचे निविदा धारक यांचे दर मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**टिप्पणी :**

उपरोक्त विषयान्वये विनंती सादर की, अहमदनगर महानगरपालिका अधिकारी / पदाधिकारी यांचे कार्यलयीन कामकाजासाठी सन २००९-२०१० करिता वाहने भाडयाने लावणे कामी दैनिक नगर टाईम्स या वृत्तपत्रात दि. १७/६/०९ अन्वये जाहिर टेंडर नोटीसला अनुसरून खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

सदरहू जाहिर टेंडर नोटीसला अनुसरून खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झाल्या.

१) शंभु ट्रॅव्हल्स, अहमदनगर
२) कपिलेश्वर ट्रॅव्हल्स, अहमदनगर
३) विनायक ट्रॅव्हल्स, अहमदनगर.

वरील नमूद केलेल्या निविदांचे तांत्रिक लिफाफे दि.६/८/०९ रोजी उघडण्यात आले व सदरच्या निविदा धारकामधील सोबत जोडलेल्या तक्त्यानुसार कमीचे निविदा दरधारक १) विनायक ट्रॅव्हल्स २ ) शंभु ट्रॅव्हल्स , यांना निगोसिएशनसाठी अनुक्रमे दि.२६/८/०९ व दि. २८/८/०९ अन्वये मा. उपायुक्त (कर) यांचे दालनात बोलविले असता संबंधीत निविदाधारक यांनी त्यांचे प्रत्येकी मंजूर निविदादरामधून रू.१०/- दहा कमी करण्यात येईल असे लेखी दिलेले आहे.

तरी सोबत जोडलेल्या सन २००९-१० महानगरपालिका अधिकारी / पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजाकरिता भाडयाने वाहने लावणे कामी आलेल्या निविदा पैकी कमी दराचे निविदाधारक १) विनायक ट्रॅव्हल्स २) शंभु ट्रॅव्हल्स यांचे निगोसिएशन मध्ये व दिलेल्या लेखी नुसार होणा-या रक्कमेच्या खर्चास व कामास त्याचप्रमाणे मा.उपप्रादेशिक परिवहन कार्यालय यांचेकडून प्राप्त झालेल्या अटी / शर्तीनुसार व महानगरपालिकेच्या सोयीनुसार होणारा करारनामा करून घेणे त्याचप्रमाणे नियमानुसार होणारी अनामत रक्कम भरून घेउन कामाचे कार्यारंभ आदेश देणेस मा.स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख व मेकॅनिकल इंजि. यांचा अहवाल असे.

--**--

**विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेच्या योग्य परवानाधारक वाहने सन २००९-१० सालाकरिता भाडयाने पुरविणे कामी आलेल्या दरपत्रकांचा तुलनात्मक तक्ता रिपोर्ट.

मा.सादर,

अहमदनगर महानगरपालिकेच्या कार्यालयीन कामकाजाकरिता सन २००९-१० सालाकरिता योग्य वाहने (परमीट) उपलब्ध करणेकामी आलेल्या दरपत्रकांच्या तुलनात्मक तक्ता केला असून सन २००९-१० करिता वाहनांचे दर निश्चीती करणे जरूरीचे आहे.

| अ. नं. | वाहनाचा प्रकार | निविदाधारकाचे नाव | वाहनांचे इंधन ॲव्हरेज कि.मी. | सन २००७-०८ चे मंजूर | सन २००९-१० निविदा दर | निविदा निगाोसिएशन नंतरचे दर (२४ तासाकरिता ) |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | टाटासुमो | विनायक ट्रॅव्हल्स | १० | ५२५/- | ५५०/- | ५४०/- |
| २ | स्कॉर्पिओ | विनायक ट्रॅव्हल्स | १० | ७००/- | ६२०/- | ६१०/- |
| ३ | मार्शल | शंभू ट्रॅव्हल्स | १० | ५२५/- | ५३०/- | ५२०/- |
| ४ | मारूतीव्हॅन | शंभू ट्रॅव्हल्स | १० | ४५०/- | ५१०/- | ५००/- |
| ५ | टाटा इंडिका | शंभू ट्रॅव्हल्स विनायक ट्रॅव्हल्स | १५ | ४९०/- | ५३०/- | ५२०/- |
| ६ | सॅन्ट्रो | विनायक ट्रॅव्हल्स | १० | -- | ६००/- | ५९०/- |
| ७ | मारूती इस्टीम | शंभू ट्रॅव्हल्स | १० | -- | ६००/- | ५९०/- |
| ८ | ॲसेट | विनायक ट्रॅव्हल्स | १० | -- | ६९०/- | ६८०/- |
| ९ | इंडिगो | शंभू ट्रॅव्हल्स | १२ | -- | ५२०/- | ५१०/- |

महानगरपालिका, अधिकारी / पदाधिकारी करिता परवानाधारक वाहने उपलब्ध करणेकामी वरीलप्रमाणे दर मंजूर करणेस मा.स्थायी समिती यांचेकडेस सविनय सादर.

येणे प्रमाणे मोटार व्हेईकल विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अधिकारी /पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता वाहने भाडयाने लावणे कामी आलेले कमीचे दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- महानगरपालिकेकडेस भाडे तत्वावरील किती वाहने भाडेतत्वावर कार्यरत आहेत.

मोटर व्हेईकल विभाग लिपीक श्री. अशोक कांबळे :- महानगरपालिकेचे वसुली विभागाकडेस चार वाहने, सहाय्यक आयुक्त, आरोग्य विभाग, मुख्य लेखा परिक्षक, नगररचना यांचेकडेस प्रत्येकी एक वाहन याप्रमाणे आठ वाहने भाडे तत्वावर लावणेत आलेली असून मा. सभापती-स्थायी समिती ,मा. सभागृह नेता, मा.विरोधी पक्ष नेता, मा.उपसभापती-महिला बालकल्याण समिती, मा.उपायुक्त (सा.), यांना स्वतःचे वाहन वापरणे बाबत प्रतिपुर्ती देउन्न वाहने कार्यरत आहेत.

मा.श्री.भोसले ग.पुं.:- वाहनाचे प्रतिपूर्ती करिता काही अटी आहेत का?

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- वाहन स्वतःचे वापरावे अशी अट आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- ऑफिस रिपोर्टानुसार आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी /पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे अधिकारी /पदाधिकारी यांचे कार्यालयीन कामकाजासाठी सन २००९-२०१० या आर्थिक वर्षाकरिता वाहने भाडयाने लावणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व त्या वरील ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमी दराचे निविदा धारक (१) विनायक ट्रॅव्हल्स, अहमदनगर ( २) शंभु ट्रॅव्हल्स, अहमदनगर यांनी निगोशिएशन अंती कमी करून दिलेल्या खालील प्रमाणेचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे.

| अ. नं. | वाहनाचा प्रकार | निविदाधारकाचे नाव | निविदा निगोसिएशन नंतरचे दर (२४तासाकरिता ) |
|---|---|---|---|
| १ | टाटासुमो | विनायक ट्रॅव्हल्स | ५४०/- |
| २ | स्कॉर्पिओ | विनायक ट्रॅव्हल्स | ६१०/- |
| ३ | मार्शल | शंभू ट्रॅव्हल्स | ५२०/- |
| ४ | मारूतीव्हॅन | शंभू ट्रॅव्हल्स | ५००/- |
| ५ | टाटा इंडिका | शंभू ट्रॅव्हल्स<br>विनायक ट्रॅव्हल्स | ५२०/- |
| ६ | सॅन्ट्रो | विनायक ट्रॅव्हल्स | ५९०/- |
| ७ | मारूती इस्टीम | शंभू ट्रॅव्हल्स | ५९०/- |
| ८ | ॲसेट | विनायक ट्रॅव्हल्स | ६८०/- |
| ९ | इंडिगो | शंभू ट्रॅव्हल्स | ५१०/- |

ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७० दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७० दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५७ मधील केडगाव गावठाण अंतर्गत वडार वस्ती व इतर भागतील उघडया गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,०६,१३०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्रभाग क्र.५७ मध्ये केडगाव गावठाण अंतर्गत वडार वस्ती व इतर भागातील उघडया गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- ५७

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. सुनिल कोतकर, नगरसेवक

४] लेखाशिर्षः- अ ] नांव मागासवर्गीय कल्याणकारी योजना ( रजि. २ पान.११६)

ब] तरतुद :- रू. ५०,००,०००/- १,५०,००,००/- नवीन तरतुद

क] यापुर्वीचा खर्च :- रू.७७,२३,५०१/- ७७,२३,५०१/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १,०६,१३०/- १,०६,१३०/-

इ] एकुण खर्च :-रू. ७८,२९,६३१/- ७८,२९,६३१/-

ई] शिल्लक :-रू. + २८,२९,६३१ /- - ७१,७०,३६९/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी उघडी गटर असल्याने नागरिकांच्या आरोग्यास धोका निर्माण होवू शकते त्यामुळे उघडया गटारीवर स्लॅब नसल्याने परिसरात दुर्गंधी पसरते.

६] प्रस्ताव :-

| | | |
|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी- | रूंदी- |
| ब] पाईप लाईन | लांबी- | व्यास- |
| क] स्लॅब | लांबी- १९० मी. | रूंदी- १.२० मी. |
| ड] इमारती क्षेत्रफळ | | |
| इ] इतर | | |

ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष :- यापूर्वी काम झालेले नाही.

७] दरसुची :- सा.बां.विभाग २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. १,०६,१३०/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री. एस.आर.निंबाळकर Sdxxx/-

१०] उपशहर अभियंता :- शा.अ. यांच्या प्रस्तावानुसार मान्येतस्तव सादर.

११] शहर अभियंता :- बजेट तरतूद वाढवावी लागेल. दि१७/८/०९

१२] मुख्य लेखा परिक्षक :-

१३] मुख्य लेखा अधिकारी :- मागासवर्गीय कल्याणकारी योजनेतंर्गत रक्कम रू. १,०६,१३०/- चे खर्चास प्रशासकीय मान्यतेस्तव सादर सुधारित तरतूद रू.१.५० कोटी योग्य ती दुरूस्ती बांधकाम विभागाने करावी. दि.१७/८/०९

१४] मा.उपायुक्त साहेब :- प्रस्तावीत प्रशासकीय खर्च मंजुरीस्तव सादर.

१५] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२६/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५७ मधील केडगाव गावठाण अंतर्गत वडार वस्ती व इतर भागतील उघडया गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,०६,१३०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- ** --

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- प्रभाग क्रमांक ५७ मधील केडगांव गांवठाणअंतर्गत उघडया गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणेचे कामास व खर्चास प्रशासकीय मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कांबळे र.द.:- प्रशासकीय मंजूरी देणे विषयीचा प्रस्ताव आहे. मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा विषय क्रमांक ७० ते ७२ प्रशासकीय मंजूरीसाठीचे प्रस्ताव आहेत ते सर्व मंजूर करावे.

मा.श्री. कांबळे र.द. :- विषय क्रमांक ७० ते ७२ चे प्रस्तावास प्रशासकीय मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- विषय क्रमांक ७० ते ७२ चे ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजुरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५७ मधील केडगाव गावठाण अंतर्गत वडार वस्ती व इतर भागतील उघडया गटारीवर आर.सी.सी. स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,०६,१३०/-( रूपये एक लाख सहा हजार एकशे तीस फक्त ) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडू.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७१ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७१ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील कायनेटीक चौका जवळील रोहीदास वाडी स्लम एरिया मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच २०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी.( एनपी २ )ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,००,५६४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. ५५ कायनेटीक चौक जवळ रोहीदास वाडी स्लम एरिया मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच २०० एमएम व्यासाची आर.सी.सी. एनपी२ ड्रेनेज लाईन टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. विजय गव्हाळे , नगरसेवक

४] लेखाशिर्षः- अ] नांव मागासवर्गीय कल्याणकारी निधी ( रजि.१ पान.११८ अ.नं.३४)
ब] तरतुद :- रू. १,५०,००,०००/-
क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,१७,२०,४५०/-
ड] प्रस्तावीत खर्च :- रू.३,००,५६४/-
इ] एकुण खर्च :- रू.१,२०,२१,०१४/-
ई] शिल्लक :- रू.२,९७,८९,८६/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी गटर ही विटाची असून फार जुनी असुन सदर गटारीची ब-याच ठिकाणी पडझड झाली असून पावसाळामध्ये सांडपाणी रस्त्यावर येते. त्यामुळे त्या ठिकाणी पाईप गटर करणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | |
|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी- १६० मीटर | रूंदी- | |
| ब] पाईप लाईन | लांबी- १५० मीटर | व्यास- २०० मी. | |
| क] गटर | लांबी- ------ | रूंदी- ----- | |
| ड] इमारती क्षेत्रफळ | ------- | | |
| इ] इतर | ------- | | |
| ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष :- | १८ वर्षे | | |

७] दरसुची :- म.जि. प्रा. २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू.३,००,५६४/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री.व्ही.जी. सोनटक्के Sdxxx/-

१०] मा.नगररचनाकार :- वीट बांधकामाची गटर नादुरूस्त असलेने ती पाडून आर.सी.सी. पाईप टाकणेचा प्रस्ताव असलेने मा. नगररचनाकार यांचे अभिप्रायाची आवश्यकता नाही.

११] मा.उपशहर अभियंता:- शा.अ.यांच्या प्रस्तावान्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजना अंतर्गत रक्कम ३,००,५६४=०० चे खर्चास मान्यता देणे योग्य. दि.२८/८/०९

१२] मा.शहर अभियंता :- प्रस्ताव मान्यतेस्त मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य. दि२८/८/०९

१३] मा.मुख्य लेखा परिक्षकः- } प्रस्ताव मंजूर करणेसाठी स्थायी समिती पुढे ठेवणेत यावे.
१४] मा. मुख्य लेखाधिकारी :- }

१५] मा.उपायुक्त साहेब :- स्थायी समितीकडे मंजुरीसाठी शिफारस करणे योग्य.दि.२९/८/०९.

१६] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२९/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील कायनेटीक चौका जवळील रोहीदास वाडी स्लम एरिया मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच २०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी.( एनपी २ )ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,००,५६४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील कायनेटीक चौका जवळील रोहीदास वाडी स्लम एरिया मध्ये पेव्हींग ब्लॉक बसविणे तसेच २०० एम.एम. व्यासाची आर.सी.सी.(एनपी २ )ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,००,५६४/-( रूपये तीन लाख पाचशे चौसष्ट फक्त )चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडू.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७२ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७२ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील रेल्वे स्टेशन बोहरी चाळ जवळील लक्ष्मी माता मंदिर ते तुळजाभवानी मंदिर पर्यत रस्ता डांबरीकरण करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,२१,६३३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. ५५ रेल्वे स्टेशन येथे बोहरी चाळ जवळ लक्ष्मी माता मंदिर ते तुळजाभवानी मंदिर पर्यत रस्ता डांबरीकरण करणे.

२] प्रभाग क्रमांक :- ५५

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. विजय गव्हाळे , नगरसेवक

४] लेखाशिर्षः- अ] नांव :- मागासवर्गीय कल्याणकारी निधी ( रजि.नं.२पान.११८ अ.नं.३५)

ब] तरतुद :- रू. १,५०,००,०००/-

क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,२०,२१,०१४/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. ३,२१,६३३/-

इ] एकुण खर्च :- रू.१,२३,४२,६४७/-

,ई] शिल्लक :- रू.२६ ,५७,३५३/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी पिण्याचे पाईप लाईनचे काम प्रस्तावीत असुन सदर ठिकाणी खोदाई होणार आहे. त्या ठिकाणी डांबरीकरण करणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | |
|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी- १२० मीटर x ५.५० मीटर | | |
| ब] पाईप लाईन | लांबी- ------ | व्यास- | |
| क] गटर | लांबी- ------ | व्यास- | |
| ड] इमारती क्षेत्रफळ | --------------- | | |
| इ] इतर | --------------- | | |
| ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | | ------ | |

७] दरसुची :- म.जि. प्रा. २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू.३,२१,६३३/-

९] शाखा अभियंत्याचे नाव व सही :- श्री.व्ही.जी. सोनटक्के Sdxxx/-

१०] मा.नगररचनाकार :- पूर्वीचे कॉक्रीटीकरणाचा रस्ता आस्तित्वात असलेने मा. नगररचनाकार यांचे अभिप्रायाची आवश्यकता नाही.

११] मा.उपशहर अभियंताः- शा.अ.यांच्या प्रस्तावान्वये मागासवर्गीय कल्याणकारी योजना अंतर्गत रक्कम ३,२१,६३३/- चे खर्चास मान्यता देणे योग्य. दि.८/८/०९

१२] मा.शहर अभियंता :- प्रस्ताव मान्यतेस्त मा.स्थायी समितीकडे सादर करणे योग्य. दि२८/८/०९

१३] मा.मुख्य लेखा परिक्षकः- } काम मंजूर करणे साठी स्थायी समिती पुढे ठेवावे.
१४] मा. मुख्य लेखाधिकारी :- }

१५] मा.उपायुक्त साहेब :- प्रस्तावीत स्थायी समितीकडे मंजूरीस्तव सादर. दि. २९/८/०९

१६] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२९/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील रेल्वे स्टेशन बोहरी चाळ जवळील लक्ष्मी माता मंदिर ते तुळजाभवानी मंदिर पर्यत रस्ता डांबरीकरण करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,२१,६३३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ५५ मधील रेल्वे स्टेशन बोहरी चाळ जवळील लक्ष्मी माता मंदिर ते तुळजाभवानी मंदिर पर्यत रस्ता डांबरीकरण करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये ३,२१,६३३/-( रूपये तीन लाख एकवीस हजार सहाशे तेहतीस फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढिल कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडू.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७३ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७३ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- कामगार विभाग दिनांक ११/८/०९

आरोपीत कर्मचारी श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार यांचेवरील खातेनिहाय चौकशीबाबत.

चौकशी अधिकारी :- श्री. आर.एम.ढाकणे, कामगार अधिकारी

चार्ज ऑफिसर :- श्री. शेख अन्वर, स्वच्छता निरिक्षक

आरोपीत कामगार :- श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार

सादर,

आरोपीत कामगार श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार यांना आस्थापना आदेश ३४९ दिनांक १६/३/२००९ अन्वये आरोपपत्र क्र .३७० दि.१६/५/२००७ चे देण्यात आले त्याचा सारांश असा,

आपण दि. २०/६/२००५ पासून वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता कामावर परस्पर गैरहजर आहात. सदरील आपल्या कृत्यामुळे महानगरपालिकेच्या कामाचा खोळंबा झालेला आहे.

असे आरोप आरोपीत कामगारावर आरोप पत्रात ठेवण्यात आले. आरोपीत कामगाराने आरोपपत्रास लेखी खुलासा दिलेला असुन चौकशी दरम्यान दि.६/८/२००९ व दि.७/८/२००९ रोजी समक्ष जबाब दिलेला आहे. सदर मध्ये त्यांनी त्यांचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केले असुन, "माझा अपघात झाला होता त्याचा परिणाम माझ्या मानसिक अवस्थेवर झाल्यामुळे कामावर हजर नव्हतो. तरी मला एक वेळ माफ करून कामावर हजर करून घ्यावे अशी विनंती केली आहे. तसेच सोबत मेडीकल सर्टिफिकेटस सादर केलेले आहे.

आरोपीत कर्मचा-याने त्याचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केलेले आहेत त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहेत त्यांची नेमणुक तारीख १२/६/२००४ अशी असुन नेमणुक तारखेपासून दि.२०/६/२००५ पावेतो २०९ दिवस वेळोवेळी कामावर गैरहजर आहेत.

आरोपीत कर्मचा-यावरील आरोप शाबीत झालेले असल्याने त्यांचे विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांना पुर्वी करण्यात आलेल्या शिक्षा याचा विचार करणे योग्य होईल तसेच त्यांचे दि.२०/६/२००५ पासुनच्या गैरहजेरीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

--**--

**फेरसादर,** दिनांक१७/९/२००९

आरोपीत कर्मचारी श्री. संतोष श्रीधर साठे, स.का. यास देण्यात आलेल्या आरोपपत्र क्र.३७० दि.१६/५/२००७चे खातेनिहाय चौकशी अंती दोषसिध्दी नंतर त्यांना जा.नं.कामगार १९१२ दि.७/९/२००९ अन्वये, तुम्हास मा.स्थायी समितीच्या मंजूरीने महानगरपालिका सेवेतुन काढून टाकण्यात येत आहे.

"अशी शिक्षा का करण्यात येउत्र नये" याबाबत मु.प्रां. म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६ (३) अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली असता त्यांनी दि.११/९/२००९ अन्वये खुलासा देउत्न मला जर अशा प्रकारची शिक्षा झाल्यास माझे भविष्यात कधीही भरून ने येणारे नुकसान होणार आहे. यामुळे माझे कुटुंब उध्वस्त होणार आहे.

तरी मला एकवेळ माफ करून नोकरीतुन कमी न करता काम करण्याची शेवटची संधी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

येणे प्रमाणे फेरसादर असे.

याप्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे. दि .२३/९/०९

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- चर्चा करा. दि. २३/९/०९

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- समक्ष चर्चेनुसार-आरोपीत कर्मचारी यांनी कारणे दाखवा नोटीसला दिलेला खुलासा समर्पक वाटत नाही करिता त्यांना उपरोक्त नमुदनुसार सुचविलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल तरी प्रकरण मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर. दि.०३/१०/२००९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.०६/१०/२००९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये ं वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये ं झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सफाई कामगार श्री. संतोष साठे यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना महानगरपालिका सेवेतुन बडतर्फ करणेस मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. लोंढे शि.बा. व मा.सौ. ढोणे म.सु. :- सदर कर्मचारी यांना सभेसमोर बोलावण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- श्री. संतोष साठे यांना सभेमध्ये बोलावण्यांत यावे.

त्याप्रमाणे श्री. संतोष साठे ,सफाई कामगार सभेमध्ये हजर झाले.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- श्री. साठे आपण नोकरीस कधी लागला आहात. ?कामावर गैरहजर का होता. ?

स. का. श्री. संतोष साठे :- डोक्याला मार लागला समजले नाही.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- महानगरपालिकामध्ये काम करण्याची इच्छा आहे का?

आस्थापना विभाग श्री. खोलम :- श्री. संतोष साठे सफाई कामगार यांना आस्थापना आदेश ३४९ दिनांक १६/३/२००९ अन्वये दिनांक २०/६/२००५ पासून वरिष्ठांची परवानगी न घेता कामावर परस्पर गैरहजर आहेत. अशाबाबत आरोपपत्र दिले असता आरोपीत कर्मचारी यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशीमध्ये शाबीत झालेले आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- श्री. संतोष साठे हे आरोपपत्र दिलेचे दिनांक २०/६/२००५ पूर्वी- २०९ दिवस कामावर गैरहजर होते. व दिनांक २०/६/२००५ पासून ते कामावर गैरहजर आहेत. त्यांचा अपघात झालेमुळे ते कामावर गैरहजर होते असे सांगतात मा. सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- त्यांना एकवार संधी देण्यांत यावी.कामावर गैरहजर राहिल्यास बडतर्फ करावे.
मा.सौ. ढोणे मा.सु.:- सर्वांना एकवार संधी देण्यांत यावी.
मा.श्री. पवार बा. रे.:- गैरहजर राहिल्यास मा.स्थायी समिती सभेची मंजूरी न घेता बडतर्फ करण्यांत यावे.
मा.श्री. बारस्कर पो.ज. :- गैरहजर राहिल्यास बडतर्फ करावे.
मा.श्री. भोसले ग.पुं.:- एक संधी म्हणून त्यांना एक डिसेंबर २००९ पासून कामावर हजर करून घ्यावे. हजर झाले नंतर वरिष्ठांची परवानगी न घेता सदर कर्मचारी आठ दिवस जरी कामावर गैरहजर राहिले तरी त्यांना मा.स्थायी समितीची मंजूरी न घेता म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करण्यांत यावे.
मा.श्री. गव्हाळे वि.ना.:- एक वेळ संधी म्हणून त्यांना कामावर घेणेस मंजूरी देण्यांत यावी. गैरहजर कालावधीचा पगार त्यांना देण्यांत येवु नेय.
मा.सभापती साहेब :- श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार यांना एक वेळ संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांत यावे.त्यांचे गैरहजर कालावधीचा पगार त्यांना देण्यात येवु नये. तसेच कामावर हजर झाले नंतर आठ दिवस जरी वरिष्ठांची पूर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**<u>ठराव :-</u>** श्री. संतोष श्रीधर साठे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे विषयी प्रशाससाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१] आरोपीत कर्मचारी यांना एक वेळ अखेरची संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.
२] त्यांना गैरहजर कालावधीचा पगार भत्ते इत्यादी देण्यात येवु नयेत.
३] कामावर हजर झालेनंतर आठ दिवस जरी वरिष्ठांचे पुर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेत यावे.

सुचक :- मा.श्री. भोसले गणेश पुंडलिक.

अनुमोदक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.
ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७४ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७४ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** श्री.धीरज काशिनाथ सोनवणे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- कामगार विभाग दिनांक १४/८/०९

आरोपीत कर्मचारी श्री.धीरज काशिनाथ सोनवणे,सफाई कामगार यांचेवरील खातेनिहाय चौकशीबाबत.

चौकशी अधिकारी :- श्री. आर.एम.ढाकणे, कामगार अधिकारी

चार्ज ऑफिसर :- श्री.आर. एल. सारसर, स्वच्छता निरीक्षक

आरोपीत कामगार :- श्री. धीरज काशिनाथ सोनवणे, सफाई कामगार

सादर,

आरोपीत कामगार श्री.धीरज काशिनाथ सोनवणे, सफाई कामगार यांना आस्थापना आदेश ६४६ दिनांक १३/५/२००९ अन्वये आरोपपत्र क्र .४८ दि.२५/५/२००९ चे देण्यात आले त्याचा सारांश असा,

आपण दि. २५/११/२००८ पासून वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता कामावर परस्पर गैरहजर आहात. सदरील आपल्या कृत्यामुळे महानगरपालिकेच्या कामाचा खोळंबा झालेला आहे.

असे आरोप आरोपीत कामगारावर आरोप पत्रात ठेवण्यात आले. आरोपीत कामगाराने आरोपपत्रास लेखी खुलासा दिलेला असुन चौकशी दरम्यान दि.११/८/२००९ व दि.१३/८/२००९ रोजी समक्ष जबाब दिलेला आहे. सदर मध्ये त्यांनी त्यांचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केले असुन, "माझी मन:स्थिती ठीक नसल्याने कामावर हजर नव्हतो तरी मला एक वेळ माफ करून कामावर हजर करून घ्यावे अशी विनंती केली आहे."

आरोपीत कर्मचा-याने त्याचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केलेले आहेत त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहेत त्यांची नेमणुक तारीख १९/७/१९८३ अशी असुन नेमणुक तारखेपासून दि.२५/११/२००८ पावेतो ४६८५ दिवस वेळोवेळी कामावर गैरहजर आहेत.तसेच त्यांना यापुर्वी १. आस्था.जा.क्र.३६०५ दि.२/८/१९९९ अन्वये गैरहजर कालावधी असाधारण रजा व एक वेळ कडक ताकीद २. आस्था.जा.क्र. २४६८ दि.२६/६/२०००अन्वये गैरहजर कालावधी असाधारण रजा व एक वेळ कडक ताकीद ३. कामगार जा.क्र. ५४६५ दि.२९/१०/०२अन्वये गैरहजर कालावधी बिनपगारी करण्यात येत आहे.४.आस्था. जा.क्र.११३९ दि.१८/११/०३अन्वये एक वेळ कडक ताकीद देउन्न असाधारण रजा ५. आस्था. जा.क्र. २१४५ दि.१३/९/०४ अन्वये एक वेळ कडक ताकीद देउन्न गैरहजर कालावधी बिनपगारी रजा धरून एक वेतनवाढ कायमस्वरूपी बंद करण्यात येत आहे. ६. कमगार जा.क्र. ४२०० दि.२३/१/०६ अन्वये गैरहजर कालावधी विनावेतनी असाधारण रजा करण्यात येत आहे. तुम्हास तुमचे वेतनश्रेणीतील मुळ वेतनावर आणण्यात येत आहे. ७. कामगार जा.क्र. २३१४ दि.१०/१०/२००७ अन्वये रू. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर परस्पर व बेकायदेशीरपणे गैरहजर रहाणार नाही तसे झाल्यास मला कामावरून कमी करण्यात यावे असे प्रतिज्ञापत्र घेउन्न गैरहजर कालावधी विनावेतनी असाधारण रजा धरण्यात येत आहे व दोन वेतनवाढी पुढील वेतनवाढीवर परिणाम होईल अशा पध्दतीने रोखण्यात येत आहे अशा शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

आरोपीत कर्मचा-यावरील आरोप शाबीत झालेले असल्याने त्यांचे विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांना पुर्वी करण्यात आलेल्या शिक्षा याचा विचार करणे योग्य होईल तसेच त्यांचे दि.२५/११/२००८ पासुनच्या गैरहजेरीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी आदेशार्थ सादर.

यांप्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

--**--

**फेरसादर,** दिनांक २४/९/२००९

आरोपीत कर्मचारी श्री. धीरज काशिनाथ सोनवणे, स.का. यांना देण्यात आलेल्या आरोपपत्राच्या खातेनिहाय चौकशी अंती दोषसिध्दी नंतर त्यांना जा.नं. कामगार १९११ दि.७/९/२००९अन्वये "तुम्हास मा.स्थायी समितीच्या मंजूरीने महानगरपालिका सेवेतून काढून टाकण्यात येत आहे." अशी शिक्षा का करण्यात येउ्र नये याबाबत मुं.प्रा.म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(३) अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली असता त्यांनी दिनांक २३/९/२००९ रोजी खुलासा देउ्रन माझी मनःस्थिती ठिक नसल्याने मी कामावर नव्हतो मी आरोप मान्य केलेले आहेत. सदर शिक्षा केल्यास माझ्याबरोबर माझ्या कुटुंबियांवर त्याचा विपरीत परिणाम होईल तरी मला सेवेतुन काढून न टाकता माफ करून एक वेळ कामाची संधी दयावी अशी विनंती केलेली आहे.

येणेप्रमाणे फेर सादर असे.

येणे प्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे.

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- आरोपीत कर्मचारी यांनी कारणे दाखवा नोटीसला दिलेल्या खुलासा समर्पक वाटत नाही करिता त्यांना उपरोक्त नमुद नुसार सुचविलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल तरी प्रकरण मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर. दि. ०३/१०/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ०६/१०/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- सफाई कामगार श्री. धीरज काशिनाथ सोनवणे यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करणेस मंजूरी मिळणे बाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. कांबळे र.द.:- त्यांना एकवार संधी देण्यांत यावा.

मा.उपायुक्त (सा) श्री. हांगे साहेब :- सफाई कामगार श्री. धीरज सोनवणे हे एकूण ४६८५दिवस कामावर गैरहजर आहेत. त्यांना म.न.पाने करावयाच्या सर्व शिक्षा करून झालेल्या आहेत.त्यांची एक वेतनवाढ कायम स्वरूपी बंद करण्यांत येउ्रन त्यांना मुळ वेतनावर आणलेले आहे. मा. सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- त्यांना सभेमध्ये बोलवावे.

मा.सभापती साहेब :- सफाई कामगार श्री. सोनवणे यांना सभेमध्ये बोलावण्यांत यावे.

त्याप्रमाणे श्री. धीरज सोनवणे सफाई कामगार हे सभेमध्ये उपस्थित झाले.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- कामावर कधी लागला ? कामावर किती वर्षापासून आहात ?

स.का. श्री. सोनवणे :- आठवत नाही.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- कामावर गैरहजर का होता?

स.का. श्री. सोनवणे :- तब्येत बरोबर नव्हती.

आस्थापना विभाग श्री. खोलम :- यांची नेमणूक तारीख १९/७/१९८३ अशी आहे.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. / मा.श्री. कांबळे र.द. :- एकवार संधी देण्यांत यावी.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- आपण विचारलेल्या प्रश्नांची नीट उत्तरे यांना देता येत नाहीत. त्यांना वेळोवेळी शिक्षा केलेल्या असुन त्यांना मुळ वेतनावर आणलेले आहे. शेवटची शिक्षा म्हणून म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेसाठी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- अशी किती प्रकरणे आहेत.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- १०० ते १५० केसेसे आहेत.

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- एकवार संधी देण्यांत यावी. त्यांना कामावर हजर करून घ्यावे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- त्यांना एक डिसेंबर पासून कामावर हजर करून घ्यावे. हजर झालेनंतर वरिष्ठांची परवानगी न घेता आठ दिवस जरी त कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची मंजूरी न घेता म.न.पा. सेवेतुन काढुन टाकावे.

मा.श्री. कांबळे र.द.:- एक वेळ संधी म्हणून त्यांना कामावर घेणेस मंजूरी देण्यांत यावी.त्यांचे गैरहजेरीचा पगार त्यांना देणेत येवु नये.

मा.सभापती साहेब :- श्री. धीरज काशिनाथ सोनवणे , सफाई कामगार यांना एक वेळ संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांत यावे. त्यांचे गैरहजर कालावधीचा पगार त्यांना देण्यात येवु नये. तसेच कामावर हजर झाले नंतर आठ दिवस जरी वरिष्ठांची पूर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** श्री. धीरज काशिनाथ सोनवणे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे विषयी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१] आरोपीत कर्मचारी यांना एक वेळ अखेरची संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

२] त्यांना गैरहजर कालावधीचा पगार भत्ते इत्यादी देण्यात येवु नयेत.

३] कामावर हजर झालेनंतर आठ दिवस जरी वरिष्ठांचे पुर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेत यावे.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री.कांबळे रवि दगडु

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७५ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७५ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-**श्री. भारत लालचंद चावरे ,सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे याप्रमाणे शिक्षा करणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- कामगार विभाग दिनांक ७/८/२००९

आरोपीत कर्मचारी श्री. भारत लालचंद चावरे, सफाई कामगार यांचेवरील खातेनिहाय चौकशीबाबत.

चौकशी अधिकारी :- श्री. आर.एम.ढाकणे, कामगार अधिकारी

चार्ज ऑफिसर :- श्री. पी.एस.बीडकर, स्वच्छता निरिक्षक

आरोपीत कामगार :- श्री. भारत लालचंद्र चावरे, सफाई कामगार

सादर,

आरोपीत कामगार श्री. भारत लालचंद चावरे,सफाई कामगार यांना आस्थापना आदेश १३५४ दिनांक ११/६/२००९ अन्वये आरोपपत्र क्र.४६५ दि.२०/६/२००९ चे देण्यात आले त्याचा सारांश असा,

आपण दि. २१/१/२००९ पासून वरिष्ठांची पुर्व परवानगी न घेता कामावर परस्पर गैरहजर आहात.यापूर्वी देखील आपण गैरहजर असल्याबाबत जा.क्र. कामगार २५५९ दि. ३१/१०/२००७ अन्वये गैरहजर कालावधी असाधारण रजा व आपणास मुळवेतनावर आपणण्यात आलेले आहे.

असे आरोप आरोपीत कामगारावर आरोप पत्रात ठेवण्यात आले. आरोपीत कामगाराने आरोपपत्रास लेखी खुलासा दिलेला असुन चौकशी दरम्यान दि.१/८/२००९ व दि.४/८/२००९ रोजी समक्ष जबाब दिलेला आहे. सदर मध्ये त्यांनी त्यांचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केले असुन, "माझी मानसिक स्थिती ठीक नसल्याने मी कामावर हजर नव्हतो तरी मला एक वेळ माफ करून कामावर हजर करून घ्यावे अशी विनंती केली आहे.

आरोपीत कर्मचा-याने त्याचेवर आरोपपत्रात ठेवलेले आरोप कबुल केलेले आहेत त्यामुळे ते शिक्षेस पात्र ठरत आहेत त्यांची नेमणुक तारीख १३/५/२०००अशी असुन नेमणुक तारखेपासून दि.२१/१/२००९ पावेतो १९२९ दिवस वेळोवेळी कामावर गैरहजर आहेत. तसेच त्यांना पूर्वी १. जा.क्र. आस्थापना ३७४८ दि.१७/८/२००२ अन्वये गैरहजर कालावधी विनावेतनी असाधारण रजा व एक वेळेस कडक ताकीद २. जा.क्र. आस्थापना ९०६८ दि.२८/३/२००३ अन्वये गैरहजर कालावधी विनावेतनी असाधारण रजा व एक वेळेस कडक ताकीद ३. कामगार २५५९ दि. ३१/१०/२००७ अन्वये गैरहजर कालावधी असाधारण रजा व आपणास मुळवेतनावर आणण्यात येत आहे अशी शिक्षा करण्यात आलेल्या आहेत.

आरोपीत कर्मचा-यावरील आरोप शाबीत झालेले असल्याने त्यांचे विरूध्द शिक्षेचा निर्णय घेतांना त्यांना पुर्वी करण्यात आलेल्या शिक्षा याचा विचार करणे योग्य होईल तसेच त्यांचे दि.२१/९/२००९ पासुनच्या गैरहजेरीचा देखील निर्णय होणे आवश्यक आहे.

तरी आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे चौकशी अधिकारी यांचा अहवाल असे.

**फेरसादर,** दिनांक १७/९/२००९

आरोपीत कर्मचारी श्री. भारत लालचंद चावरे, स.का. यांस देण्यात आलेला आरोपपत्राचे खातेनिहाय चौकशी अंती दोषसिध्दी नंतर त्यांना जा.नं. कामगार १९१३ दि.७/९/०९ अन्वये, "तुम्हास मा.स्थायी समितीच्या मंजुरीने महानगरपालिका सेवेतुन काढून टाकण्यात येत आहे" अशी शिक्षा का करणेत येउत्र नये याबाबत मु.प्रा.म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(३) अन्वये कारणे दाखवा नोटीस दिली असता त्यांनी दि.११/९/२००९ अन्वये खुलासा देउत्न "मला जर अशा प्रकारची शिक्षा झाल्यास माझे भविष्यात कधीही भरून न येणारे नुकसान होणार आहे.यामुळे माझे कुटुंब उध्वस्त होणार आहे. तरी मला एक वेळ माफ करून नोकरीतून कमी न करता काम करण्याची शेवटची संधी देण्यात यावी" अशी विनंती केली आहे.

येणे प्रमाणे फेरसादर असे.

याप्रमाणे कामगार अधिकारी यांचा अहवाल असे. दि .२३/९/०९

मा.उपायुक्त साहेब (सा.) :- चर्चा करा. दि. २३/९/०९

मा.उपायुक्त साहेब (सा.):- समक्ष चर्चेनुसार-आरोपीत कर्मचारी यांनी कारणे दाखल नोटीसला दिलेला खुलासा समर्पक वाटत नाही करिता त्यांना उपरोक्त नमुदनुसार सुचविलेली शिक्षा कायम करणे योग्य होईल तरी प्रकरण मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणेसाठी मान्यतेस्तव सादर. दि.०३/१०/२००९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.०६/१०/२००९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्यें वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्यें झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः-सफाई कामगार श्री. भारत लालचंद चावरे यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशीमध्ये सिध्द झाल्याने त्यांना म.न.पा.सेवेतुन बडतर्फ करणेस मंजूरी मिळणेबाबत प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- त्यांना सभेमध्ये बोलवावे.

मा.सभापती साहेब :- सफाई कामगार श्री. चावरे भारत यांना सभेमध्ये बोलावण्यांत यावे.

त्याप्रमाणे श्री. चावरे भारत ,सफाई कामगार हे सभेमध्ये उपस्थित झाले.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- कामास कधी लागला होता.? कामावर गैरहजर का आहात?

स.का. श्री. भारत चावरे :- गाडी वरून पडलो होतो.एक वेळ माफ करावे कामावर हजर करून घ्यावे.

मा.श्री. पवार बा.रे. :- एक वेळ संधी म्हणून त्यांना कामावर हजर करून घ्यावे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- यांची नेमणूक तारीख १३/५/२००० अशी असुन त्यांचा अद्याप पावेतो एकूण १९२९ दिवस कालावधी गैरहजर असा आहे ते दिनांक २१/१/२००९ पासून कामावर गैरहजर आहेत. त्यांना यापूर्वी तीन वेळेस शिक्षा केलेल्या असुन त्यांना मुळे वेतनावर आणलेले आहे. मा.सभेने निर्णय घ्यावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- त्यांना एक वेळ संधी देण्यांत यावी.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- त्यांना एक डिसेंबर पासून कामावर हजर करून घ्यावे हजर झालेनंतर वरिष्ठांची परवानगी न घेता आठ दिवस जरी ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची मंजूरी न घेता म.न.पा. सेवेतुन काढुन टाकावे.

मा.श्री.पवार द.ज. :- एक वेळ संधी म्हणून त्यांनी कामावर हजर करून घेण्यांत यावे. त्यांचे गैरहजर कालावधीचा पगार त्यांना देण्यांत येवु नये.

मा.श्री. पवार बा.रे. :- एकवार संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांत यावे.

मा.सभापती साहेब :- श्री. भारत लालचंद चावरे, सफाई कामगार यांना एक वेळ संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांत यावे. त्यांचे गैरहजर कालावधीचा पगार त्यांना देण्यात येवु नये. तसेच कामावर हजर झाले नंतर आठ दिवस जरी वरिष्ठांची पूर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. सेवेतुन बडतर्फ करण्यांस सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** श्री. भारत लालचंद चावरे, सफाई कामगार यांचेवर ठेवलेले आरोप खातेनिहाय चौकशी मध्ये सिध्द झाल्याने त्यांना मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ५६ (२) (ग) नुसार म.न.पा. सेवेतुन काढून टाकणे विषयी प्रशासनाने सादर केलेल्या प्रस्तावावर सभेमध्ये झालेल्या चर्चेनुसार पुढील प्रमाणे निर्णय घेण्यांत येत आहे.

१] आरोपीत कर्मचारी यांना एक वेळ अखेरची संधी म्हणून कामावर हजर करून घेण्यांस मंजूरी देण्यांत येत आहे.

२] त्यांना गैरहजर कालावधीचा पगार भत्ते इत्यादी देण्यात येवु नयेत.

३] कामावर हजर झालेनंतर आठ दिवस जरी वरिष्ठांचे पुर्व परवानगी न घेता ते कामावर गैरहजर राहिल्यास त्यांना मा.स्थायी समितीची पूर्व परवानगी न घेता म.न.पा. अधिनियम १९४९ चे कलम ५६(२) (ग) अन्वये म.न.पा. सेवेतुन काढून टाकणेत यावे.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत.

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७६ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७६ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंटची नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :- मा.फेर सादर, **विषय**- UIDSSMT योजनेअंतर्गत मंजूर झालेली **अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-२** राबविणे साठी " प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंसलटंटची" नियुक्ती करणे साठी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणे बाबत.

**संदर्भ :-** १] मा. सर्वसाधारण ठराव क्र.१७ दि.१०/८/२००९
२] दि.१६/९/२००९ रोजीच्या प्राप्त निविदा.

वरील कामाच्या निविदा मा.आयुक्त, पाणी पुरवठा विभाग प्रमुख, मा. मु.ले. प. , मा. मु. ले.अ. , उपअभियंता पा.पु., तसेच उपस्थित निविदाधारकासमोर दि.१६/९/२००९ रोजी उघडण्यात आल्या.

निविदा स्विकृतीच्या वेळी दि.१६/९/०९ रोजी मुदतीत व विहीत वेळेत खालील एकूण ४ निविदाधारकांनी सिलबंद निविदा सादर केलेल्या होत्या.

१] युनिटी कंन्सलटंट, पुणे
२] वॅपकोस लि., दिल्ली
३] शिंदे असोसिएट कन्सलटींग इंजिनिअर्स, प्रा.लि. जळगाव
४] स्ट्रडकॉम कंन्सलटंट, प्रा.लि. पुणे

प्राप्त निविदांच्या तांत्रिक लिफाफे उघडले असता आर्थिक दराचे लिफाफे उघडणेस हरकत नसलेबाबत मा.मु.ले.प., मा.मु.ले.अ. व उपस्थित सर्व प्रतिनिधीनी सांगितलेनुसार आर्थिक लिफाफे उघडण्यात आले. (सोबत आर्थिक दराचा तुलनात्मक तक्ता)

आर्थिक दराचे लिफाफे उघडले असता खालीलप्रमाणे दर प्राप्त झालेले आहेत.

| | **प्राप्त दर**<br>[DPR रक्कम ७३.०५ कोटी ] |
|---|---|
| १] युनिटी कंन्सलटंट, पुणे | २.७७ % फी |
| २] वॅपकोस लि. दिल्ली | तांत्रिक माहिती अपुरी असल्यामुळे आर्थिक दराचा लिफाफा उघडला नाही |
| ३] शिंदे असोसिएट कन्सलटींग इंजिनिअर्स प्रा.लि. जळगाव | ३.५२ % फी |
| ४] स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि., पुणे | २.७०% फी |

प्राप्त निविदा व दर यांचा तुलनात्मक अभ्यास करता, स्पर्धात्मक दृष्टया स्ट्रडकॉम कंन्सलटंट, पुणे यांचे दर सर्वात कमीचे म्हणजेच २.७० % आलेले आहेत.

प्राप्त कमीचे दर आणखी कमी करणेच्या दृष्टीकोनातुन कमीचे दरधारक मे. स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि., पुणे यांचे दि.१६/९/०९ रोजी दाखल केलेल्या निविदे बाबत त्यांचे दर लघूत्तम दराचे असल्याने त्यांना दराचे वाटाघाटीसाठी दि.१/१०/२००९ रोजी मा.आयुक्त यांचे दालनात निविदा समितीसमोर बोलविण्यात आले होते.

त्यानुसार निविदा समितीच्या बैठकीत मे. स्ट्रटकॉम प्रा.लि. पुणे यांचे प्रतिनिधी श्री. जावडेकर यांना वाटाघाटी बाबत विचारणा करण्यात आली असता त्यांनी सदरचे दर २.७०% वरून ०.०५ % इतके कमी म्हणजेच २.६५% इतके दराने काम करणेस तयार असले बाबत अंतीम सहमती दर्शविली व त्याबाबतचे लेखी पत्र हे सादर केलेले आहे.

तरी अहमदनगर शहर पाणी पुरवठा फेज-२ चे कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंट म्हणून मे. स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि. यांनी निगोसिएशन नुसार कमी करून दिलेल्या २.६५% चे दरास व त्यानुसार येणारे एकूण खर्च रू. १,९३,५८,२५०/- चे खर्चास मा.स्थायी समितीची मंजूरी घेवून पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. **/ अ**

येणे प्रमाणे पाणी पुरवठा विभाग प्रमुख यांचा अहवाल असे.

मा. मुख्य लेखा परिक्षक :- उपरोक्त प्रस्तावीत केलेल्या "अ" नुसार शहर पाणी पुरवठा फेज-२ साठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंट म्हणून मे. स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि. पुणे यांचा दर २.६५% व एकूण खर्च रू. १,९३,५८,२५०/- मान्यतेसाठी स्थायी समिती पुढे ठेवणेस हरकत नाही. दि. २१/१०/०९

मा. मुख्य लेखा अधिकारी- शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ साठी P.M.Cची नेमणूक करणेस व योजनेच्या २.६५% इतक्या रकमेस मंजूरीबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीस सादर करणेस हरकत नाही. दि.२१/१०/०९

मा.उपायुक्त (सा.)साहेबः- प्रस्तावीत स्थायी समितीकडे मंजूरीसाठी पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.२२/१०/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २२/१०/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा फेज-२ राबविणे कामी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंटची नियुक्ती करणे कामी आलेल्या निविदा दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखवावा.

त्याप्रमाणे ऑफिस रिपोर्ट वाचून दाखविणेत आला.

मा.श्री. बारस्कर पो.ज./मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंटकडून करून घ्यावयाचे कामाची माहिती सांगावी.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले साहेब :- अहमदनगर शहर महानगरपालिका शहर पाणी पुरवठा वितरण व्यावस्थापन फेज-२ कामी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे कडून कामाचा वर्कींग सर्व्हे करणे, प्रारूप निविदा तयार करणे, स्विकृत निविदेसाठी तांत्रिक आर्थिक तुलनात्मक विवरणपत्र तयार करणे तसेच काम सुरू असतांना हे काम पूर्ण होवुन यशस्वी चाचणी होईपर्यत देखरेख करणे. लाईन आउट्ट देणे व मंजूर आराखडया नुसार तपासणी करणे वेगवेगळया मातीच्या स्तराची सेफ बेअरींग कॅपसीटी ठरविणे, वेगवेगळया कामाची देखरेख करणे, वेगवेगळया साहित्याची तपासणी त्रयस्त यंत्रणे मार्फत करून घेणे, आर.सी.सी. कामांची संकल्पणे प्रमाणे तपासणी करणे रोजच्या रोज झालेल्या कामांचे मोजमाप घेणे रेकॅार्ड करणे व ठेकेदाराने दिलेले देयक प्रमाणीत करून देणे बीलाचे रकमेबाबत मार्गदर्शन करणे. ठेकेदारांबरोबर कामाचे आढाव्याची मा.आयुक्त साहेब यांचे दालनात किमान १५ दिवसातुन एकदा बैठक आयोजित करणे, आवश्यक्तेनुसार मा. शासनाचे मागणीनुसार सुधारित योजना तयार करणे,रेल्वे,सार्वजनिक बांधकाम विभाग, रस्ते विकास महामंडळ व इतर शासकीय/निमशासकीय संस्थाकडून रस्त्याचे बाजूने अगर रस्ता छेदन्यासाठी महानगरपालिकेचे वतीने परवानगी घेणे.भुसंपादन, भाववाढ, जादा परिमाण इत्यादीचे प्रस्ताव, मासिक प्रगती अहवाल तयार करणे वेगवेगळे रजिस्टरे ठेवणे परवानगी साठी वेगवेगळया शासकीय/निमशासकीय खात्याकडे प्रस्तावासंबंधी पाठपुरावा करणे, भौतिक आर्थिक प्रगती अहवाल तयार करून तो महानगरपालिकेचे वतीने मा. शासनास सादर करणे याप्रमाणेची कामे करून घेणे आहेत.

मा. श्री. पवार बा.रे. :- या योजनेमधील कामाचे स्वरूप काय आहे ते सांगावे प्रोजेक्ट योजना कितीची आहे.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- फेज-२ अंतर्गत मुळानगर विळद येथील आवश्यक पंपींग मशिनरी बदलणे विळद ते वसंतटेकडी पर्यत ७००एम.एम. व्यासाची डी.आय.पाईप लाईन टाकणे वसंत टेकडी येथे मुख्य संतुलन टाकी बांधणे शहर भागात तसेच विस्तारित भागात पाण्याच्या उंच टाक्या बांधणे,मुख्य संतुलन टाकी (वसंत टेकडी) ते अस्तित्वातील टाक्या तसेच प्रस्तावीत उंच टाक्या पर्यत गुरूत्व वाहिन्या टाकणे वेगवेगळया प्रभागामध्ये अंतर्गत वितरण व्यवस्थे कामी जलवाहिन्या टाकणेची कामे करणे आहेत. सदरची यु.आय.डी.एस.एस.एम.टी.अंतर्गत सदरची रक्कम रूपये ९१ कोटीची मंजूरीसाठी सादर केली होती. ती रूपये ७३.०५ कोटीची मंजूर झाली आहे. मा. शासनाकडून रूपये २९ कोटी अनुदान जमा झालेले आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी यु.आय.डी.एस.एस. एम.टी. चे कामाबाबत दिलेल्या सुचनाचे पालन करणे संबंधी मा. आयुक्त साहेब यांनी मा.सभापती ,स्थायी समिती यांना पत्र दिलेले आहे. सदरचे पाणी पुरवठा योजना फेज-२ योजना राबविणे बाबत चे कार्यक्रमानुसार दिनांक १५/११/२००९ पूर्वी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीस स्थायी समितीची मान्यता घेणे दिनांक १८/११/२००९ रोजी स्थायी समितीने मंजूर केलेल्या निविदा धारकास कार्यादेश देणे दिनांक २०/११/२००९ रोजी करार करणे. दिनांक ५ डिसेंबर २००९ रोजी निविदा प्रसिध्द करणे. दिनांक २९ डिसेंबर २००९ रोजी निविदा स्विकरणे व उघडणे दिनांक १० जानेवारी २०१० पर्यत स्थायी समितीची मंजूरी घेणे. दिनांक १५ जानेवारी २०१० पर्यत कामाचे कार्याचा कार्यादेश देणे याप्रमाणे मुदतीत विहित प्रक्रिया होणे बंधकारक आहे नसता कामाची अखर्चीत रक्कम अन्य महानगरपालिकेस अदा केली जाईल असे, मा. प्रधान सचिव नगरविकास विभाग यांनी सुचित केले आहे. विधानसभा निवडणूकीचे आचारसंहितेमुळे कामास विलंब झालेला आहे. करिता विहित मुदतीत योजनेच्या कामास मंजूरी द्यावी.

मा.श्री. पवार द.ज./ मा.श्री. बारस्कर पो.ज. :- कंन्सलटंट संस्था कशी आहे.

मा.उपायुक्त (सा.) श्री. हांगे साहेब :- कंन्सलटंट संस्था चांगली आहे.

मा.श्री. लोंढे शि.बा.:- मुळानगर ते विळद पंपींग पर्यत पाईप लाईनचे काम आहे. तेथे टेकडया आहेत.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- विळद पाईप लाईन बदलणे आवश्यक नाही.

मा.श्री. पवार बा.रे.:- आलेले कामाचे दरास व खर्चास मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज.:- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणी पुरवठा फेज-२ चे कामासाठी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंट नेमणे कमी आलेले कमीचे दरास व खर्चास मंजूरी देण्यांत यावी. ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करावा.

**<u>ठराव :-</u>** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ राबविणे कामी प्रोजेक्ट मॅनेजमेंट कंन्सलटंटची नियुक्ती करणे कामी मागविण्यांत आलेल्या निविदा दराचा तुलनात्मक तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक मे. स्ट्रडकॉम कंन्सलटंट प्रा.लि., पुणे यांनी निगोशिएशन नुसार कमी करून दिलेल्या (डि.पी.आर. रकमेची) २.६५% (दोन पुर्णांक पासष्ठ शतांश टक्के) कमीचे दरास व त्यानुसार येणारे रक्कम रूपये १,९३,५८,२५०/- (अक्षरी रूपये एक कोटी त्र्याण्णव लाख अठ्ठयावन्न हजार दोनशे पन्नास फक्त) चे खर्चास मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७७ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७७ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००९-२०१० सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट निर्णयार्थ.

**प्रस्तावाचा मजकूर** :-प्रस्तावना-विषय- अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००९-२०१० सालाकरिताचे गट क्र.,१,२,३ व ५ चे वार्षिक दर ठरविणेकामी मा.स्थायी समितीची मंजूरी मिळणेबाबत.

**टिप्पणी-** अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील मुळानगर पंपीग स्टेशन, विळद पंपीग स्टेशन व जलशुध्दीकरण केंद्र नागापूर पंपीग स्टेशन व वसंतटेकडी पंपीग स्टेशन येथील पंप इलेक्ट्रीक मोटारी इत्यादीसह मुळानगर ते वसंतटेकडी दरम्यान दोन मुख्य जलवाहिन्या यांचे तातडीने दुरूस्ती कामे करणेसाठी मा. आयुक्त साहेब यांचे प्रशासकीय मंजूरीने एकूण १ ते ७ गटाकरीता जाहिर निविदा मागविण्यात आलेल्या आहेत.

वरील कामी गट क्र.१ ते ६ साठी एकूण १७ कोरी निविदांची विक्री झाली होती. त्यापैकी निविदा स्विकृतीच्या वेळेत व मुदतीत गट क्र. १,२,३,५ व ६ साठी करिता एकूण १६ निविदा प्राप्त झालेल्या आहेत. गट क्र.४ करीता एकच निविदा प्राप्त झाल्याने त्यासाठी फेरनिविदा प्रक्रीया चालू आहे. व गट क्रमांक ६ करीताचे प्राप्त दराच्या वाटाघाटी प्रलंबित आहे.

प्राप्त निविदा मा.उपायुक्त साहेब ,मा. मुख्य लेखाधिकारी, मा. मुख्य लेखापरिक्षक व निविदाधारक यांचे समक्ष उघडून व तुलनात्मक तक्ता तयार करून कमीचे प्राप्त निविदाधारक यांचेशी निविदादारात वाटाघाटी करून मंजूरीसाठी सादर केलेल्या प्रस्तावामध्ये **गट क्र. १,२,५** मान्यतेस्तव , गट क्र.३ मधील अ.नं. २,३,व ४ प्राप्त निविदा **मान्यतेस्तव** व अ.नं. १,५,६ साठी **फेरनिविदा मागविणे** योग्य राहिल. अशा स्वरूपाच्या सादर प्रस्तावामध्ये अशा मा.मुख्य लेखाधिकारी, मा.मुख्य लेखापरिक्षक, मा.उपायुक्त व मा.आयुक्त साहेब यांनी मा.स्थायी समितीची मंजूरी घ्यावी असे निर्देशित केलेले आहे. अशाबाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती समोर मंजूरीस्तव सविनय सादर.

येणे प्रमाणे मेकॅनिकल इंजिनिअर पाणी पुरवठा विभाग यांचा अहवाल असे.

--**--

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निगोशिएशन अधिक दर | कमीचे निविदा दर धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| **१** | १ | मुळानगर येथील ५६० अश्वशक्ती पंपाचे दुरूस्तीबाबत | | निविदेमध्ये असलेल्या दराचे ०.२% कमीचे दर | श्री.दत्त स्टिल आणि इलेक्ट्रीकल इंडस्ट्रिज बुरूडगावरोड, अहमदनगर |
| | २ | विळद नवीन पंपहाउत्स मधील ३०० एच.पी.व्हि.टी.पंपाचे दुरूस्तीबाबत. | | --"-- | --"-- |
| | ३ | विळद जुने पंपहाउस मधील ३०० एच.पी.[घेरी] पंपाचे दुरूस्ती बाबत. | | --"-- | --"-- |
| | ४ | मुळानगर व विळद येथील २०० एच.पी.व्ही.टी पंप दुरूस्ती | | --"-- | --"-- |
| | ५ | वसंत टेकडी, आर.टी.ओ. टाकी व इंडस्ट्रीयल इस्टेट येथील ६० अश्वशक्ती पंप दुरूस्ती | | --"-- | --"-- |

| गट क्र. | अ. नं. | विषय | अंदाजे वार्षिक खर्च | निगोशिएशन अधिक दर | कमीचे निविदा दर धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| **२** | १ | मुळानगर येथील ५६० अश्वशक्ती मोटार दुरूस्ती | | निविदेमध्ये असलेल्या दरानुसार | अविहास इले.प्रा.लि.ए-२१ एम.आय.डी.सी. अहमदनगर |
| | २ | विळद पंपहाउस व नागापूर पंपहाउस मधील ३०० एच.पी.व्ही.टी.मोटार दुरूस्ती बाबत. | | --"-- | --"-- |
| | ३ | विळद जुने पंपहाउस येथील ३०० एच.पी.हॉरीओन्टल मोटार दुरूस्तीबाबत. | | --"-- | --"-- |
| | ४ | मुळानगर व विळद नवीन पंपहाउस येथील २०० एच.पी. | | --"-- | --"-- |
| | ५ | वसंत टेकडी, आर.टी.ओ.टाकी व इंडस्ट्रीयल इस्टेट टाकी येथील ६० अश्वशक्ती मोटार दुरूस्ती | | --"-- | --"-- |

--***--

| गट क्र. | अ. नं. | विषय | | अंदाजे वार्षिक खर्च | निविदेतील दर | निगोशिएशन अधिक दर | कमीचे दर निविदा धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **३** | १ | पाईप लाईन दुरूस्ती साहित्य | | | | | मयुर सप्लार्यस, अ.नगर |
| | २ | डिझेल जनरेटर सेट भाडयाने लावणे. | २० KVA | | ७००/- | ६७५/- | --"-- |
| | | | ३० KVA | | १०००/- | ९७५/- | --"-- |
| | ३ | गॅसकटर सेट भाडयाने लावणे | | | ६००/- | ५७५/- | --"-- |
| | ४ | वेल्डींग मशिन सेट भाडयाने लावणे | ३ फेज | | ६५०/- | ६२५/- | --"-- |
| | | | १ फेज | | ३५०/- | ३२५/- | --"-- |
| **५** | | | | अंदाजे वार्षिक खर्च | निविदेतील दर | निगोशिएशन दर | कमीचे दर निविदा धारकाचे नाव |
| | १ | फिल्टर मिडिया वाळू पुरविणे | | | ----- | ------ | ------ |
| | २ | ब्लोअर मशिन गिअरसाठी गिअर ऑइल पुरविणे | | | ---- | ----- | ------ |
| | ३ | २५० एमएम स्लुस व्हॉलचा स्पिंडल बनविणे. | | | ६०००/- | ५८००/- | गणेश मेकॅ.वर्क्स, |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | अ.नगर |



| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | ४ | २५० एमएम स्लुस व्हॉलचा चेकनट बनविणे. | | १५००/- | १५००/- | --"-- |
| | ५ | ४५० एमएम स्लुस व्हॉलचा स्पिंडल बनविणे. | | ११०००/- | १०५००/- | --"-- |
| | ६ | ४५० एमएम स्लुस व्हॉलचा चेकनट बनविणे. | | ३०००/- | ३०००/- | --"-- |
| | ७ | ३०० एमएम स्लुस व्हॉलचा स्पिंडल बनविणे. | | ९०००/- | ८५००/- | --"-- |
| | ८ | ३०० एमएम स्लुस व्हॉलचा चेकनट बनविणे. | | २५००/- | २५००/- | --"-- |
| | ९ | २५०/३००/४५०/ एमएम स्लुस व्हॉलचे ग्लॅड बनविणे. | | ४००/- | ४००/- | --"-- |
| | | | | ६००/- | ६००/- | --"-- |
| | | | | ९००/- | ९००/- | --"-- |
| | | सर्वो सिस्टीम १५० नं. ऑइल पुरविणे. | | ----- | ------ | ------ |

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००९-२०१० सालचे आलेले वार्षिक दरास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज.:- प्रस्तावाची माहिती द्यावी.

पा.पु. विभाग प्रमुख श्री. चौगुले :- अहमदनगर महानगरपालिकेच्या शहर पाणी पुरवठा योजनेवरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००९-२०१० सालाकरिता चे गट क्रमांक १,२,३ व ५ चे आलेले कमीचे दरास मंजूरी मिळणे विषयी प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार बा.रे. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- आलेले कमीचे दरास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करणेत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे शहर पाणी पुरवठा योजने वरील विविध दुरूस्तीची कामे व साहित्याचे सन २००९-२०१० सालचे वार्षिक दर ठरविणे कामी मागविण्यांत आलेल्या गट क्रमांक १ ते ६ चे निविदा दराचा तक्ता व ऑफिस रिपोर्ट पहाता गट क्रमांक १,२, ५ व गट क्रमांक ३ मधील अ.नं. २,३ व ४ या आयटेमचे स्पर्धात्मक दृष्टया कमीचे निविदा दर धारक यांनी निगोसिएशन अंती कमी करून दिलेल्या कमीचे दरास मंजूरी देण्यांत येत आहे. तसेच गट क्रमांक ३ मधील अ.नं. १,५ व ६ साठी फेरनिविदा मागविणेस मंजूरी देण्यात येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

अनुमोदक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**

**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७८ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७८ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्याल्यापर्यत ३०० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,८५३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. ३७ येथे सुरेश वाघचौरे घर ते शिवपावन मंगल कार्यालय पर्यत ३०० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- ३७

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. गणेश उर्फ उमेश खंडेराव कवडे (नगरसेवक)

४] लेखाशिर्षः- अ] नांव :-मागासवर्गीय कल्याणकारी योजना
(र.नं.२बजेट रजि.पान.११७ अ.नं.३०)

ब] तरतुद :- रू. १,५०,००,०००/-
क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,०५,८०,२८१/-
ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १,२५,८५३/-
इ] एकुण खर्च :- रू. १,०७,०६,१३४/-
,ई] शिल्लक :- रू.४२,९३,८६६/-

५] सद्यस्थिती :- ------------------------------------------------------------------------------------

६] प्रस्ताव :-
अ] रस्ते लांबी- रूंदी
ब] पाईप लाईन लांबी- व्यास-
क] गटर
ड] इमारती क्षेत्रफळ
इ] इतर
ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष

७] दरसुची :- म.जि. प्रा./ सा.बां.वि २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू.१,२५,८५३/-

शाखा अभियंता नांव व सही :- श्री. गाडळकर जी.के. sdxxx/-

मा.उपशहर अभियंता :- मान्यतेस्तव सादर दि.२६/१०/०९

मा. शहर अभियंता :- मान्यतेस सादर. दि२७/१०/०९

मुख्य लेखा परिक्षक :- प्रस्तावीत केलेल्या ड्रेनेज काम रक्कम रू. १,२५,८५३/- प्रशासकीय मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करावे. दि. २९/१०/०९

मुख्य लेखा अधिकारी :- मा.स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर. दि. २९/१०/०९

मा.उपायुक्त (सा.) साहेब :- मा.स्थायी समितीकडे पाठविणे योग्य दि. ३०/१०/०९

मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ३०/१०/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्याल्यापर्यत ३०० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,८५३/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेबः-प्रभाग क्रमांक ३७ मधील ड्रेनेजचे कामास व खर्चास मंजूरी देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. कांबळे र.द. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा

मा.श्री. गव्हाळे वि.ना. :- प्रस्ताव क्रमांक ७८ ते ८१ हे प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी आहेत. ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. कांबळे र.द. :- प्रस्ताव क्रमांक ७८ ते ८१ चे प्रस्तावास मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- प्रस्ताव क्रमांक ७८ ते ८१ चे ऑफिस रिपोर्टास सर्वानुमते मंजूरी देण्यांत यावी.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्याल्यापर्यत ३०० एमएम व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२५,८५३/- (रूपये एक लाख पंचवीस हजार आठशे त्रेपन्न फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ७९ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ७९ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्याल्यापर्यत सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,३६,२८०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. ३७ येथे सुरेश वाघचौरे घर ते शिवपावन मंगल कार्यालय पर्यत सिमेंट कॉक्रीट करणे.

२] प्रभाग क्रमांक :- ३७

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.श्री. गणेश उर्फ उमेश खंडेराव कवडे (नगरसेवक)

४] लेखाशिर्षः- अ] नांव :-मागासवर्गीय कल्याणकारी योजना
( रजि.नं.२ पान.११७ अ.नं.३०)
ब] तरतुद :- रू. १,५०,००,०००/-
क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,०७,०६,१३४/-
ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १,३६,२८०/-
इ] एकुण खर्च :- रू. १,०८,४२,४१४/-
,ई] शिल्लक :- रू.४१,५७,५८६/-

५] सद्यस्थिती :- ------------------------------------------------------------

६] प्रस्ताव :- अ] रस्ते लांबी- ----- रूंदी - ------
ब] पाईप लाईन लांबी- ----- व्यास- ------
क] गटर
ड] इमारती क्षेत्रफळ
इ] इतर
ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष -------

७] दरसुची :- सा.बां.वि. २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू.१,३६,२८०/-

९] शाखा अभियंता नांव व सही :- श्री. गाडळकर जी.के. sdxxx/-

१०] मा.उपशहर अभियंता :- मान्यतेस्तव सादर दि.२६/१०/०९

११] मा. शहर अभियंता :-रक्कम रू.१,३६,२८०/-चे खर्चास प्रशायकीय मान्यतेस सादर दि.२७/१०/०९/ **"अ"**

१२] मुख्य लेखा परिक्षक :- वरील 'अ' मध्ये प्रस्तावीत केल्याप्रमाणे सिमेंट कॉक्रीट काम खर्च रू. १,३६,२८०/- प्रशासकीय मान्यतेसाठी स्थायी समितीकडे सादर करावे. दि२९/१०/०९

१३] मुख्य लेखाधिकारी :- मा.स्थायी समितीचे मंजूरीस्तव सादर. दि. २९/१०/०९ / **"अ"**

१४] मा.उपायुक्त (सा.)साहेब :-**'अ'** प्रस्तावीत मान्यतेसाठी स्थायी समितीकडे पाठविणे योगय. दि. ३०/१०/०९

१५] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. ३०/१०/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्याल्यापर्यत सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,३६,२८०/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक ३७ मधील श्री. सुरेश वाघचौरे घर ते शिव पावन मंगल कार्याल्यापर्यत सिमेंट कॉक्रीट करणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,३६,२८०/- (रूपये एक लाख छत्तीस हजार दोनशे ऐंशी फक्त )चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,<br>
स्थायी समिती,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ८० दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ८० दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील रामवाडीतील गडाख नाला साफ करून स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२२,४९९/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. २३ , रामवाडीतील गडाख नाला साफ करून स्लॅब टाकणे.

२] प्रभाग क्रमांक :- २३

३] सुचविणा-यांचे नांव :- मा.नगरसेविका सौ. गिरीजाबाई उडाणशिवे

४] लेखाशिर्षः:- अ] नांव :-मागासवर्गीय कल्याणकारी योजना

( रजि.नं.२ पान.११७/२७) ब] तरतुद :- रू. १,५०,००,०००/-

क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,००,२०,७७०/-

ड] प्रस्तावीत खर्च :- रू. १,२२,४९९/-

इ] एकुण खर्च :- रू. १,०१,४३,२६९/-

,ई] शिल्लक :- रू.४८,५६,७३१/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी जुनी दगडी गटर असुन गाळ व कच-याने सदर नाला भरलेला असल्याने पावसाचे पाणी वाहून जाणेसाठी काम प्रस्तावीत केले आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | |
|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी- | ----- | रूंदी - | ------ |
| ब] पाईप लाईन | लांबी- | ----- | व्यास- | ------ |
| क] ड्रेनेज | व्यास | ----- | लांबी- | ------- |
| ड] इमारती क्षेत्रफळ | | | | |
| ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | | ------- | | |

७] दरसुची :- ---------------

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू.१,२२,४९९/-

९] अभियंत्याचे नांव व सही :- श्री. नामदे निशांत

१०] नगररचनाकार यांचे अभिप्राय :- ----------------------------

११] उपशहर अभियंता :- क.अ. यांच्या प्रस्तावाप्रमाणे रू. १,२२,४९९/- चे खर्चास मा.स्थायी समितीकडे प्रस्ताव पाठविणे योग्य वाटते. दि.२५/८/०९

१२] शहर अभियंता :- मा.स्थायी समितीकडे मान्यतेस सादर करणे योग्य. दि.२८/८/०९ /**"अ"**

१३] मुख्य लेखा परिक्षक :- } 'अ' मान्यतेसाठी दि२८/८/०९

१४] मुख्य लेखाधिकारी :- } ----------------

१५] मा.उपायुक्त (सा)साहेब :- मा.स्थायी समिती कडे मंजूरीसाठी शिफारस करणे योग्य. दि.२९/०८/०९

१६] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि.२९/०८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील रामवाडीतील गडाख नाला साफ करून स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२२,४९९/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील रामवाडीतील गडाख नाला साफ करून स्लॅब टाकणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये १,२२,४९९/-( रूपये एक लाख बावीस हजार चारशे नव्याण्णव फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ८१ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ८१ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते रामवाडी कलामंचा पर्यत पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४१,६८४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- प्रशासकीय मान्यता प्रस्ताव

१] कामाचे नांव :- प्र.क्र. २३ , लक्ष्मीमाता मंदिर ते रामवाडी कलामंच पर्यत पेव्हींग ब्लॉक बसविणे.

२] प्रभाग क्रमांक :- २३

३] सुचविणा-यांचे नांव :- मा. नगरसेविका सौ. उडाणशिवे गिरिजाबाई

४] लेखाशिर्षः- अ] नांव :-मागासवर्गीय कल्याणकारी योजना
( रजि.नं.२ पान.११७/२९)

ब] तरतुद :- रू. १,५०,००,०००/-
क] यापुर्वीचा खर्च :- रू. १,०३,३८,५९७/-
ड] प्रस्तावीत खर्च :- रू. २,४१,६८४/-
इ] एकुण खर्च :- रू. १,०५,८०,२८१/-
,ई] शिल्लक :- रू.४४,१९,७१९/-

५] सद्यस्थिती :- सदर ठिकाणी सध्या सिमेंट कॉक्रीट रस्ता असुन तो खराब झालेला असलेने तेथे पेव्हींग ब्लॉक बसविणे आवश्यक आहे.

६] प्रस्ताव :-

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ] रस्ते | लांबी- | ----- | रूंदी - | ------ |
| ब] पाईप लाईन | लांबी- | ----- | व्यास- | ------ |
| क] गटर | व्यास | ------- | लांबी - | ------ |
| ड] इमारती क्षेत्रफळ | | | | |
| ई] यापूर्वी सदर ठिकाणी काम झालेचे वर्ष | ------- | | | |

७] दरसुची :- सा.बां.वि. २००८-०९

८] अंदाजपत्रकीय रक्कम :- रू. २,४१,६८४/-

९] कनिष्ठ अभियंता नांव व सही :- श्री. नामदे निशांत sdxxx/-

१०] मा.उपशहर अभियंता :- क.अ. यांच्या प्रस्तावानुसार अंदाजपत्रक रू. २,४१,६८४/- मान्यतेस्तव सादर.

११] मा. शहर अभियंता :- मान्यतेस सादर (मा.स्थायी समितीकडे मान्यतेस सादर करणे योग्य.) दि.२८/८/०९

१२] मुख्य लेखा परिक्षक :- सदरचे काम मान्यतेसाठी स्थायी समितीकडे ठेवणेत यावे. दि.२८/८/०९

१३] मुख्य लेखाधिकारी :- ------------------------

१४] मा.उपायुक्त (सा.)साहेब :- स्थायी समितीकडे मंजूरीस शिफारस करणे योग्य दि.२९/८/०९

१५] मा.आयुक्त साहेब :- सहमती दर्शक सही दि. २९/८/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते रामवाडी कलामंचा पर्यत पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४१,६८४/- चे खर्चास प्रशासकीय मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

--**--

**ठराव :-**अहमदनगर महानगरपालिकेचे प्रभाग क्रमांक २३ मधील लक्ष्मीमाता मंदिर ते रामवाडी कलामंचा पर्यत पेव्हींग ब्लॉक बसविणेचे कामास व अंदाजपत्रकीय रक्कम रूपये २,४१,६८४/-(रूपये दोन लाख एक्केचाळीस हजार सहाशे चौ-याऐंशी फक्त) चे खर्चास प्रशासकीय मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. गव्हाळे विजय नाना.

अनुमोदक :- मा.श्री. कांबळे रवि दगडु.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ८२ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ८२ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागामध्ये डॉ. सौ. सुरेखा निवृत्ती गउऌकर यांची वैद्यकिय अधिकारी या पदावर केलेली नेमणूक दिनांक १५ सप्टेंबर २००९ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा रूपये १०,०००/- चे मानधनावर सहा महिन्याकरिता नेमणूक देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना विभाग दिनांक १७/८/०९

विषय- डॉ. सुरेखा निवृत्ती गउऌकर, वैद्यकिय अधिकारी यांची कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुकीबाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सविनय सादर करण्यात येतो की, रक्त पेढी विभाग जा.क्र. ७२ दि.२९/७/०९ अन्वये प्रस्ताव सादर करून "रक्तपेढी विभागात डॉ. सुरेखा निवृत्ती गउऌकर, व डॉ. कंचन सुरेंद्र रच्चा यांना वैद्यकिय अधिकारी या पदावर दिनांक १६ मार्च २००९ पासून सहा महिन्याकरिता नेमणूक करण्यात आलेली आहे. सदरची नेमणूक दि.१५ सप्टेंबर ०९ अखेर संपुष्टात येत आहे. डॉ. सुरेखा निवृत्ती गउऌकर यांचे काम समाधान कारक आहे. डॉ. कंचन रच्चा यांनी दिनांक १ जुलै २००९ पासून राजीनामा दिलेला असुन त्या सध्या कामावर नाहीत. तसेच दरम्यानच्या काळात निवडणूक आचारसंहिता लागण्याची शक्यता आहे.

तरी डॉ. सुरेखा निवृत्ती गउऌकर यांचे काम समाधान कारक असल्याने त्यांना वैद्यकिय अधिकारी या पदावर कंत्राटी पध्दतीने पुर्ननियुक्ती देणे बाबत" असे नमुद केलेले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या रक्त पेढी विभागामध्ये तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दिनांक १६/३/०९ पासून सहा महिन्याकरिता रूपये १००००/- इतक्या दर महा मानधनावर वैद्यकिय अधिकारी म्हणुन नियुक्ती करण्यात आलेली आहे. डॉ.कंचन रच्चा यांनी तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी या पदाचा राजीनामा दिलेला आहे.

तरी रक्तपेढी विभाग यांचे उपरोक्त प्रस्तावानुसार रक्तपेढी विभागाकरीता डॉ. सुरेखा निवृत्ती गउऱ्डळकर यांची दिनांक १५ सप्टेंबर २००९ नंतर तांत्रिक खंड देवुन तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने मानधनावर पुढील सहा महिन्याकरीता वैद्यकिय अधिकारी या पदावर नेमणुकी बाबत निर्णयासाठी आदेशार्थ सादर. / **"अ"**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. २४/८/०९

मुख्य लेखा परिक्षक व मुख्य लेखा अधिकारी :- वरील 'अ' मान्य होणेसाठी सादर. दि.२८/८/०९

मा.उपायुक्त (सा.)साहेबः-मुं.प्रां. म.न.पा.अधिनियम १९४९मधील तरतुदीनुसार सादर करा दि.२८/८/०९

--**--

आस्थापना विभाग दिनांक १४/९/०९

विषय :- डॉ. सुरेखा निवृत्ती गउत्ळकर यांची कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी या पदावर तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुकी बाबत.

**फेर सादर,**

विनंती रिपोर्ट की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.

१. महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिका मध्ये निहीत असेल:

परंतु आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यावर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२. पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्राणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल मात्र कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही उक्त समितीने ठरविले तर, अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणुकाच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या त्यावेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल:

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळुन शंभर रूपयांहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही.असे नमुद केलेले आहे.

तरी डॉ. सुरेखा निवृत्ती गउत्ळकर यांची मुंबई महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील तरतुदी नुसार कंत्राटी पध्दतीने वैद्यकिय अधिकारी या पदावर तांत्रिक खंड देवुन तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर नेमणुकी बाबत निर्णयासाठी आदेशार्थ सादर. / **"अ"**

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा फेरसादर अहवाल असे. दि.३०/९/०९

मा.उपायुक्त (सा) साहेब :- **"अ"** प्रस्तावीत नुसार तांत्रिक खंड देवुन मा.स्थायी समिती कडे प्रकरण मंजुरीसाठी पाठविणे योग्य दि. २६/१०/०९

मा.आयुक्त साहेब :- स्थायी समितीच्या मंजुरीनंतर कंत्राटी पध्दतीवर नेमणूकीचे आदेश द्यावे, त्या आदेशात व करारात कायम सेवेचे लाभ मिळणार नाही अशी अट नमूद करावी. दि.२६/१०/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

-- ३ --

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागामध्ये डॉ. सौ. सुरेखा निवृत्ती गउत्ळकर यांची वैद्यकिय अधिकारी या पदावर केलेली नेमणूक दिनांक १५ सप्टेंबर २००९ अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा रूपये १०,०००/- चे मानधनावर सहा महिन्याकरिता नेमणूक देणेस मंजूरी मिळणे बाबत ऑफिस रिपोर्ट.

-- **--

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब:- रक्तपेढी विभागामध्ये वैद्यकीय अधिकारी डॉ.सौ. गउत्ळकर यांना सहा महिन्यासाठी मुदतवाढ देणे विषयी प्रस्ताव आहे.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- प्रस्तावाची माहिती सांगावी.

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. श्री. बोरगे :- महानगरपालिकेची रक्तपेढी चोवीस तास चालू असते. तेथे दररोज नागरिक रक्तदान करणे करिता व रक्त पिशवी घेउन्न जाणेसाठी येत असतात रक्तपेढीमध्ये चोवीस तासाचे डयुटी करिता तीन डॉक्टरांची गरज असते. तसेच डॉक्टरांचे रजा काळात रिलीव्हर म्हणून डॉक्टरांची आवश्यक्ता आहे.

मा.श्री. भोसले ग.पुं. :- सदर डॉक्टर रक्तपेढी मध्ये हजर असतात का?

वैद्यकीय आरोग्यअधिकारी डॉ.श्री.बोरगे :-रक्तपेढी मध्ये एकच डॉक्टर चोवीस तासाची डयुटी सांभाळतो.

मा.श्री. बारस्कर पो.ज. :- ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी देण्यांत यावी.

मा.श्री. पवार द.ज. :- मंजूरी देण्यांत यावी.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव** :- अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागामध्ये डॉ.सौ. सुरेखा निवृत्ती गउत्ळकर यांची वैद्यकीय अधिकारी या पदावर केलेली नेमणूक दि.१५ सप्टेंबर २००९अखेर संपुष्टात येत असल्याने त्यांची तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने दरमहा रूपये १०,०००/-(रूपये दहा हजार फक्त) चे मानधनावर सहामहिन्याकरिता नेमणूक देणेस मंजूरी देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर,खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. बारस्कर पोपट जगन्नाथ.

अनुमोदक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर**
**मा.स्थायी समिती सभा क्रमांक :-६**

विषय क्रमांक :- ८३ दिनांक ११/११/२००९

ठराव क्रमांक :- ८३ दिनांक ११/११/२००९

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता लॅब टेक्नीशियन विहित पध्दतीने दरमहा रूपये ६५००/- चे मानधनावर नेमणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

**प्रस्तावाचा मजकूर** :- आस्थापना विभाग दिनांक ६/११/२००९

विषय :- रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने लॅब टेक्नीशियन नेमणे बाबत.

सादर,

विनंती रिपोर्ट सविनय सादर करण्यांत येतो की, रक्तपेढी विभाग प्रमुख यांनी दिनांक ५/११/२००९ रोजी प्रस्ताव सादर करून त्यामध्ये "रक्तपेढी विभागामध्ये लॅब टेक्नीशियन पदांची संख्या अपुरी आहे. रक्तपेढी विभागामध्ये दररोज नागरिक रक्तदान करणे करिता व रक्त पिशवी घेवुन जाणेसाठी येत असतात. त्याकरिता आवश्यक त्याप्रमाणे रक्त नमुना चाचणी होणे आवश्यक असते. रक्तपेढी विभागामार्फत रक्तदान शिबीर आयोजीत करतांना लॅब टेक्नीशियन यांची अत्यंत आवश्यकता आहे. त्यामुळे एड्स बाबत आवश्यक ती दक्षता घेणे गरजेचे असते. रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवा असल्याने २४ तास कामकाज चालू असते. सदर ठिकाणी लॅब टेक्नीशियनची आवश्यकता आहे. अन्न व औषध प्रशासनाचे नियमानुसार सुरळीत चालू ठेवणे शक्य होईल. रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन एक पद भरणेस व सदर पदास बी.एस.सी. डी.एम. एल.टी . शैक्षणिक पात्रता व वय शासन नियमाप्रमाणे तसेच दरमहा मानधन रू. ६५००/- ठेवणे उचित होईल. सदर पात्र उमेदवारांपैकी अनुभव धारकास प्राधान्य देणे उचित राहील. रक्तपेढी विभागाकरिता एक लॅब टेक्नीशियन तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने भरणे बाबत" नमुद केलेले आहे.

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ मध्ये खालील प्रमाणे नमुद केलेले आहे.

५३:- नेमणुकीचा अधिकार कोणामध्ये निहीत असणे.

१. महानगरपालिकेच्या ज्या अधिका-यांचे किमान वेतन भत्ते वगळुन चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक आहे. मग असे अधिकारी तात्पुरते असोत किंवा कायम असोत त्यांची नेमणुक करण्याचा अधिकार महानगरपालिकामध्ये निहीत असेल.

परंतु आयुक्ताला भत्ते वगळून चारशे रूपये किंवा त्याहुन अधिक मासिक वेतन असलेल्या कर्ज विषयक कामांसाठी करावयाच्या कोणत्याही अस्थायी नेमणूका सहा महिन्यांहुन अधिक नसलेल्या कालावधीसाठी स्थायी समितीच्या पुर्व मंजुरीने या अटीवर करता येतील की आयुक्ताने अशी प्रत्येक नेमणुक करताना त्या विषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळविले पाहिजे आणि उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर महानगरपालिकेच्या पुर्व मंजुरी वाचुन अशा कोणत्याही नेमणुकीचे नवीकरण करता येणार नाही.

२. पोट-कलम (१) मध्ये अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका मुख्य लेखा परिक्षक व नगरपालिका सचिव यांच्या प्रत्यक्ष नियंत्राणाखालील नगरपालिका अधिकारी व कर्मचारी- मग ते तात्पुरते असोत किंवा कायम असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार कोणत्याही बाबतीत स्थायी समितीची मान्यता मिळविण्याचा अधिन, यथास्थिती, नगरपालिका मुख्य लेखापरिक्षक किंवा नगरपालिका सचिव यांच्याकडे निहीत असेल मात्र कोणत्याही विशिष्ट प्रकरणात किंवा प्रकरणाच्या वर्गात अशा मान्यतेची आवश्यकता नाही उक्त समितीने ठरविले तर, अशी मान्यता घेण्याची आवश्यकता असणार नाही.

३. या अधिनियमात अन्यथा तरतुद केली असेल त्या व्यतिरिक्त नगरपालिका अधिकारी व कर्मचारी मग कायम असोत किंवा तात्पुरते असोत यांची नेमणूक करण्याचा अधिकार आयुक्ताकडे निहीत असेल.

परंतु कायम नेमणुकांच्या बाबतीत असा अधिकार कलम ५१ अन्वये तयार केलेल्या व मंजूर केलेल्या त्यावेळी अमलात असलेल्या विवरणपत्राच्या अधिन असेल.

आणखी असे की, आयुक्तास स्थायी समितीच्या पुर्व मंजुरी वाचुन कोणतीही तात्पुरती नेमणूक सहा महिन्याहून अधिक असेल अशा कोणत्याही कालावधीसाठी करता येणार नाही आणि भत्ते वगळुन शंभर रूपयांहून अधिक मासिक वेतन असलेल्या कोणत्याही नेमणुकीचे उक्त सहा महिन्याचा कालावधी संपल्यानंतर नवीकरण करता येणार नाही.असे नमुद केलेले आहे.

शासकीय / निमशासकीय कार्यालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपात अथवा कायम स्वरूपाच्या नेमणूका ह्या विहित पध्दतीने करणे बाबत निर्देश दिलेले आहे. लॅब टेक्नीशियन पदावर तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने नियुक्ती करणे झाल्यास वर्ममान पत्रामध्ये जाहिरात प्रसिध्दी देवुन उमेदवारांकडून अर्ज मागवुन व मा. सहाय्यक संचालक, जिल्हा रोजगार व स्वंयरोजगार मार्गदर्शन केंद्र यांचेकडून पात्र उमेदवारांची यादी मागविणे योग्य होईल.

तसेच रक्तपेढी विभाग प्रमुख यांचे प्रस्तावामध्ये नमुद केल्यानुसार लॅब टेक्नीशियन पदाकरिता बी.एस.सी.,डी.एम.एल.टी. शैक्षणिक पात्रता व उमेदवारांचे वय शासन नियमाप्रमाणे तसेच दरमहा मानधन रू ६५००/- ठेवणे उचित होईल. तसेच सदर पात्र उमेदवारांपैकी अनुभव धारकास प्राधान्य देणे उचित होईल.

रक्तपेढी विभाग यांचे उपरोक्त प्रस्तावा प्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने लॅब टेक्नीशियन या पदावर सहा महिन्याकरिता नेमणूक करणे झाल्यास मा. स्थायी समितीची पूर्व मंजुरी घेणे आवश्यक राहील.

तरी रक्तपेढी विभाग प्रमुख यांचे प्रस्तावाप्रमाणे तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने लॅब टेक्नीशियन या पदावर सहा महिन्याकरिता नेमणूकी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे निर्णयासाठी ठेवणे बाबत मंजुरीस्तव आदेशार्थ सादर.

येणे प्रमाणे आस्थापना प्रमुख यांचा अहवाल असे. दि.६/११/०९

मुख्य लेखा परिक्षक :- रक्तपेढी विभाग यांनी प्रस्तावीत केल्याप्रमाणे एक लॅब टेक्नीशियन पद तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने घेणेबाबत चर्चा करणेसाठी प्रस्ताव स्थायी समितीपुढे ठेवणेस यावा. दि. ६/११/०९

मुख्य लेखा अधिकारी :- कंत्राटी पध्दतीने तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियनचे पद सहा महिन्यासाठी मानधनावर भरणेस हरकत नाही. मा.स्थायी समिती समितीच्या मंजुरीस्तव सादर. दि.६/११/०९

मा.उपायुक्त (सा) साहेब :- विहीत पध्दतीने मानधनावर लॅब टेक्नीशियन चे पद सहा महिन्यासाठी भरणेसाठी मा.स्थायी समितीकडे मंजुरीसाठी पाठविणे करिता मान्यतेस्तव सादर. दि.०७/११/०९

मा. आयुक्त साहेब :- सहा महिन्यासाठी कंत्राटी पध्दतीने नेमणूक करा. दि.०७/११/०९

सबब प्रकरण मा. स्थायी समिती सभे पुढे सादर.

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता लॅब टेक्नीशियन विहित पध्दतीने दरमहा रूपये ६५००/- चे मानधनावर नेमणेस मंजूरी मिळणेबाबत ऑफिस रिपोर्ट.

हा विषय सभे मध्ये वाचून दाखविला असतां त्या वर सभे मध्ये झालेली चर्चा.

मा.सभापती साहेब :- रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने लॅब टेक्नीशियन नेमणेचा प्रस्ताव आहे.

मा.श्री. पवार बा.रे.:- महानगरपालिकेचे रक्तपेढी विभगाकरिता लॅब टेक्नीशियनची आवश्यकता आहे का?

वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.श्री. बोरगे :- रक्तपेढी विभाग अत्यावश्यक सेवा असल्याने रक्तपेढी विभागाचे कामकाज २४ तास चालू असते. रक्तपेढी विभागामध्ये लॅब टोक्नीशियन पदाची संख्या अपुरी आहे. रक्त पेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्नीशियन चे एक पद सहा महिन्याकरिता रूपये ६५००/-चे दरमहा मानधनावर भरलेस रक्तपेढी विभागाचे कामकाज अन्न व औषध प्रशासनाचे नियमानुसार चालू ठेवणे शक्य होईल.ऑफिस रिपोर्टानुसार मंजूरी मिळणेस प्रस्ताव सादर केलेला आहे.

मा.श्री. पवार द.ज. :- ऑफिस रिपोर्ट मंजूर करावा.

मा.श्री. पवार बा.रे. :- मंजूर करावा.

मा.सभापती साहेब :- ऑफिस रिपोर्ट सर्वानुमते मंजूर करण्यांत यावा.

**ठराव :-** अहमदनगर महानगरपालिकेचे रक्तपेढी विभागाकरिता तात्पुरत्या स्वरूपात कंत्राटी पध्दतीने सहा महिन्याकरिता "लॅब टेक्नीशियन" विहित पध्दतीने दरमहा रूपये ६५००/-(अक्षरी रूपये सहा हजार पाचशे फक्त) चे मानधनावर नेमणेस मंजूरी देण्यांत येत आहे ऑफिस रिपोर्ट मंजूर, खर्च मंजूर.

नियमानुसार पुढील कार्यवाही करणेत यावी.

सुचक :- मा.श्री. पवार दगडू जयवंत.

अनुमोदक :- मा.श्री. पवार बाळासाहेब रेवजी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

सभापती,
स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका